# शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

वार्षिक अहवाल व ताळेबंद

सन 2021-2022

Established and Registered in 1888 under Societies Registration act XXI of 1860
Registered under Bombay Public Trusts Act no.50 of 1950
F-86-Pune

**AIMS & OBJECTS OF THE S. P. MANDALI**

1. To impart popular and reasonably affordable education in India and abroad:
2. To start private schools:
3. To take existing ones under its supervision;
4. To encourage Marathi Literature;
5. To found Marathi Instruction on sounder footing;
6. To educate Handicapped, Deaf and Dumb Pupils;
7. To encourage social and scientific research and development activities;
8. To invest any surplus funds of S. P Mandali as per section 11(5) of the Income Tax Act 1961only in modes specified in that section;
9. And to adopt such other measures as might seem desirable for carrying out above mentioned objects

**शि. प्र. मंडळीचे हेतू व उद्दिष्टे**
**(भाषान्तरीत)**

**१. भारतात व भारताबाहेर लोकप्रिय व सर्वांना परवडणारे शिक्षण देणे.**
**२. खाजगी शाळा स्थापन करणे.**
**३. अस्तित्वात असतील त्या देखरेखीखाली घेणे.**
**४. मराठी भाषेला प्रोत्साहन देणे.**
**५. मराठी शिक्षणाचा पाया दृढ करणे.**
**६. अपंग, मूक आणि बधिर विद्यार्थ्यांना शिक्षण देणे.**
**७. वैज्ञानिक व सामाजिक संशोधन व विकासाच्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे.**
**८. शि. प्र. मंडळीकडील वाढीव निधी आयकर कायदा, १९६१, कलम-११ (उपकलम ५) अनुसार गुंतविणे.**
**९. सदर हेतू सिद्धीस जाण्याकरिता अशाच प्रकारच्या दुस-या इष्ट वाटतील त्या तजविजी करणे.**

**For all Members of S. P. MANDALI**

**Members of S. P. Mandali are requested to intimate to the secretary any change in their postal address from time to time.**

**विनंती**

शिक्षण प्रसारक मंडळीच्या सदस्यांनी कृपया आपल्या पत्त्यातील बदल वेळोवेळी मा. चिटणीस, शि. प्र. मंडळी, शारदा सभागृह, स.प. महाविद्यालय, पुणे ४११०३० यांचे कार्यालयामधे कळवावा.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | मुखपृष्ठ | ४ |
| २ | शिक्षण प्रसारक मंडळीचे नियामक मंडळ<br>(०१/०४/२०२१ ते २८/०२/२०२६) | ५ |
| ३ | शिक्षण प्रसारक मंडळीचे विद्यमान प्रशासकीय मंडळ | ६-७ |
| ४ | वार्षिक साधारण सभेची सूचना | ८-१० |
| ५ | वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २७/०३/२०२२ चा वृत्तांत | ११-३७ |
| ६ | लेखापरिक्षण अहवाल २०२१-२२ | ३८-६१ |

(१८६०च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट नंबर २१ प्रमाणे दिनांक १२.०३.१८८८ रोजी नोंदविलेली)
(१९५०च्या बॉम्बे पब्लिक रजिस्ट्रेशन ॲक्ट नंबर २१ प्रमाणे नोंदविलेली एफ–८६ पुणे)

**शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे**
(स्थापना दिनांक ०५.०२.१८८८)


✻ अध्यक्ष ✻
मा. ॲड. सदानंद फडके

✻ उपाध्यक्ष ✻
मा. श्री. राजेंद्र पटवर्धन
मा. श्री. गजेंद्र पवार
मा. श्री. अनिलकुमार रुईया
मा. श्री. पवनकुमार पोदार

✻ मा. नियामक मंडळाचे अध्यक्ष ✻
मा. ॲड. सोहनलाल जैन

✻ मा. नियामक मंडळाचे उपाध्यक्ष ✻
मा. श्री. श्रीकृष्ण र. चितळे

✻ विश्वस्त ✻
मा. नियामक मंडळाचे सर्व सदस्य

✻ चिटणीस ✻
मा. प्रा. डॉ. सौ. राधिका नरेंद्र इनामदार

शिक्षण प्रसारक मंडळीचे विद्यमान नियामक मंडळ
(दिनांक ०१.०४.२०२१ ते २८.०२.२०२६)

| अ. क्र. | नांव |
|---|---|
| १ | मा. ॲड. सोहनलाल कुंदनमल जैन, पुणे : अध्यक्ष |
| २ | मा. श्रीकृष्ण रघुनाथ चितळे, पुणे : उपाध्यक्ष |
| ३ | मा. जयंत विष्णूदास किराड |
| ४ | मा. पराग शशिकांत ठाकूर, पुणे |
| ५ | मा. राजेंद्र परशुराम पटवर्धन, पुणे |
| ६ | मा. सतीश वसंत पवार, पुणे |
| ७ | मा. ॲड. मिहिर कृष्णकांत प्रभुदेसाई, पुणे |
| ८ | मा. केशव चिंतामण वझे, पुणे |
| ९ | मा. सुधीर शंकर काळकर, मुंबई |
| १० | मा. राजेश चंद्रकांत पटवर्धन, सोलापूर |
| ११ | मा. ॲड. दामोदर बद्रीनारायण भंडारी, वडगांव मावळ (इतर) |
| १२ | मा. सुनील मधुसूदन जोशी, ठाणे (इतर) |
| १३. | मा. श्री. किरण दत्तात्रय शाळिग्राम : (स्वीकृत सदस्य) |
| १४. | मा. श्री. विवेक विठ्ठल नायक : (स्वीकृत सदस्य) |

**मा. प्रशासकीय मंडळाचे प्रतिनिधी**

| | |
|---|---|
| १ | मा. प्रा. डॉ. उदय नामदेव साळुंखे |
| २ | मा. प्रा. डॉ. सौ. शोबना वासुदेवन |
| ३ | मा. प्रा. डॉ. महेश लक्ष्मीकांत अबाळे |
| ४ | मा. डॉ. सौ. अपर्णा सुनील मॉरिस |
| ५ | मा. सौ. श्रुती उल्हास बागेवाडी |
| ६ | मा. डॉ. सौ. राधिका नरेंद्र इनामदार – चिटणीस, शि. प्र. मंडळी |

****

# शिक्षण प्रसारक मंडळीचे विद्यमान प्रशासकीय मंडळ

| अ.क्र. | नांव |
|---|---|
| १. | ॲडव्होकेट मा. मिहिर कृष्णकांत प्रभुदेसाई – सदस्य, नियामक मंडळ |
| २. | मा. प्रा. डॉ. सौ. शोबना वासुदेवन, एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी., बी.एड., पीजीडीई.,– अध्यक्ष, प्रशासकीय मंडळ |
| ३. | मा. प्रा. डॉ. सौ. राधिका नरेंद्र इनामदार, एम.ए. एम.एड. पीएच.डी. – चिटणीस, शि. प्र. मंडळी |
| ४. | मा. डॉ. महेश लक्ष्मीकांत अबाळे, एम.कॉम., एम.बी.ए., पीएच.डी. – चिटणीस, प्रशासकीय मंडळ |
| ५ | मा. प्रा. डॉ. उदय नामदेव साळुंखे, डीएमई., एएमआयएमई., डीबीएम., बी.ए., एम.एम.एस. (ऑपरेशन्स), पीएच.डी., २०१२ आयसेनहोवर फेलो |
| ६ | मा. डॉ. अनुश्री लोकूर, एम.एस्सी., एम. फिल., पीएच.डी. |
| ७ | मा. सौ. प्राची गुमास्ते, एम.ए., एम.एड., डी. एस.एम. |
| ८ | मा. सौ. संगीता संजय कांबळे, बी. ए., एम. ए., बी. एड. |
| ९ | मा. सौ. श्रुती उल्हास बागेवाडी, एम.एस्सी., बी. एड. |
| १० | मा. डॉ. अपर्णा सुनील मॉरिस, बी. एस्सी., एम.ए., एम.एड., डी.एस.एम. पीएच.डी. |
| ११ | मा. सौ. रमा समीर कुलकर्णी, एम.ए., एम.एड. |
| १२ | मा. सौ. लीना सतीश वर्तक, बी.ए., बी.एड. |
| १३ | मा. सौ. आरती विश्वास खाडीलकर, एम.ए., बी.एड. |
| १४ | मा.सौ. वर्षा वसंत जेधे, एम.ए., बी.एड. |
| १५ | मा. श्री. रविंद्र भीमराज मुंगसे, एम.ए., बी.एड. |
| १६ | मा. सौ. मनीषा अद्दम, एस.एस.सी., डी.एड. |
| १७ | मा. सौ. ज्योती मुकेश बक्षी, एम.ए., टी.टी.सी. |
| १८ | मा. सौ. सविता आनंद बिराजदार, बी.एस्सी., बी.एड. ,एमसी.एम. |
| १९ | मा. सौ. दीपा दुर्गाप्रसाद कुलकर्णी, बी.ए. मॉण्टेसरी कोर्स |
| २० | मा. सौ. अर्चना गुरुराज कुलकर्णी, बी.कॉम., बी.ए., शिशु अध्यापिका कोर्स |
| २१ | मा. सौ. जयश्री शशांक एडंगावकर, बी.ए. पार्ट १(हिंदी), मॉण्टेसरी ट्रेंड |
| २२ | मा. सौ. मंजिरी वडगांवकर, बी.ए., मॉण्टेसरी ट्रेंड |
| २३ | मा. सौ. उमा विनायक घोळे, एम.ए., डी. एड. मॉण्टेसरी कोर्स, जनरल कौन्सिलिंग कोर्स |
| २४ | मा. सौ. संगिता रवींद्र शिंदे, एम.ए., बी.एड.(एच. आय.), एम.एस.डब्ल्यू.,एम.ए. (पाली) |
| २५ | मा. सौ. संगीता सिद्धराम कोळी, बी.ई., एम.एड., डी.एस.एम. |
| २६ | मा. सौ. विद्या सोनवणे, एस.एस.सी., डीएड .एम.एड. |
| २७ | मा. श्रीमती मंजुषा सूर्यकांत कुगांवकर, एम.ए.बी.एड. |

| | **प्रभारी संस्थाप्रमुख :- खास निमंत्रित** |
|---|---|
| १ | मा. सौ. स्मिता क्षीरसागर, बी.ए.,बी.पीएड..एम.पीएड. |
| २ | मा. प्रा. डॉ. सुनील वामनराव गायकवाड, एम.ए., एम.फिल., पीएच.डी. |
| ३ | मा. डॉ. सौ. अर्चना सुनील बक्षी, एम.कॉम., एम.फिल. पीएच.डी. |
| ४ | मा. डॉ. ससिकुमार नारायण मेनन, बी.एस्सी., एम.एस्सी., पीएच.डी. |
| ५ | मा. प्रमोद दामोदर वैद्य,बी.एस्सी., एम.बी.ए., एम.फिल. |
| ६ | मा. डॉ. प्रशांत दुराफे, एम. एस्सी., पीएच. डी. |
| ७ | मा. श्रीरंग कुलकर्णी - डायरेक्टर (ऑपरेशन्स्) |
| ८ | मा. सुजित मंगलोरकर - मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ९ | मा. मंदार उपासरनी - रजिस्ट्रार |

****

# वार्षिक साधारण सभेची सूचना

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेची सन २०२२-२३ या वर्षावधीतील वार्षिक साधारण सभा **रविवार दि. २८ मे, २०२३** रोजी दुपारी ४.०० वाजता **लेडी रमाबाई हॉल, स. प. महाविद्यालय आवार, पुणे -३०** येथे खालील विषयांचा विचार करून निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी शि. प्र. मंडळीच्या सर्व सभासदांनी या सभेस वेळेत उपस्थित राहावे, ही विनंती.

आज्ञेवरून,

स्थळ : पुणे
दिनांक : १०/०५/२०२३

**प्रा. डॉ. राधिका न. इनामदार**
चिटणीस, शिक्षण प्रसारक मंडळी

## क्रमणिका

१. शिक्षण प्रसारक मंडळीची मागील वार्षिक साधारण सभा दिनांक २७ मार्च २०२२ ते आज अखेर शि. प्र. मंडळीच्या दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहणे. (हितचिंतक, सर्व मान्यवर, संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर सहकारी)

२. शिक्षण प्रसारक मंडळीच्या दिनांक २७ मार्च २०२२ च्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

३. अहवाल काळात संस्थेच्या हितचिंतक, सभासद तसेच संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी व विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या बहुमानांबद्दल त्यांचे अभिनंदन करणे .

४. शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन २०२१-२०२२ चे वार्षिक अहवाल, मा. लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या हिशेबांची पत्रके या संदर्भातील ठराव संमत करणे (सन २०२१-२२ चा अहवाल हिशेब पत्रकांसह शि. प्र. मंडळीच्या वेबसाईटवर आहे. (वेबसाईटचा पत्ता :www.spmandali.org.in )

५. मा. नियामक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन २०२३-२०२४ या वर्षावधीचे हिशेबांचे तपासणीसाठी लेखापरिक्षक म्हणून पुढीलप्रमाणे नव्याने नियुक्ती करण्याचा विचार करणे.

| अ. क्र. | लेखापरिक्षकाचे नाव | तपशील |
|---|---|---|
| **१** | मेसर्स डी.आर. बर्वे अँड असोसिएट्स चार्टर्ड अकौंटंट्स, पुणे | शि. प्र. मंडळीचे कार्यालय आणि शि. प्र. मंडळीच्या पुणे, मुंबई, सोलापूर, श्रीक्षेत्र परशुराम आणि चिपळूण येथील सर्व संस्थांचे लेखापरिक्षण आणि शि. प्र. मंडळीच्या सर्व संस्थांच्या हिशेबाचे एकत्रीकरण |

६. शिक्षण प्रसारक मंडळीचे मा. अध्यक्ष, ॲड. सदानंद फडके व मा. उपाध्यक्ष, श्री. गजेंद्र पवार, श्री. राजेंद्र पटवर्धन श्री. अनिलकुमार रुईया व श्री. पवन पोद्दार यांची मुदत दि. १७ जून, २०२३ रोजी संपत आहे. तरी दि. १८ जून, २०२३ ते १७ जून, २०२८ या कालावधीकरिता संस्थेच्या घटनेनुसार शिक्षण प्रसारक मंडळीच्या मा. अध्यक्ष व ०३ उपाध्यक्षांची या वार्षिक साधारण सभेमध्ये निवड करणेबाबत विचार करणे. मा. नियामक मंडळातर्फे खालील नावे सूचविण्यात येत आहेत, त्याबाबत विचार करणे.

| अ.क्र. | पदाचे नांव | सदर पदासाठी सूचविण्यात आलेले नाव |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष, शि. प्र. मंडळी. | मा. ॲड. सदानंद गोविंद फडके |
| २ | उपाध्यक्ष, शि. प्र. मंडळी | १) मा. श्री. गजेंद्र पवार |
| शिक्षण प्रसारक मंडळी समवेत झालेल्या करारानुसार तिसरे व चौथे नाव उपाध्यक्ष पदासाठी घ्यावयाचे आहे. | | २) मा. श्री. अनिलकुमार रुईया<br>३) मा. श्री. पवन पोद्दार |

७. शि. प्र. मंडळीच्या सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.

८. संस्थेच्या अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांचा विचार करणे.

९. सभेच्या अध्यक्षांचे मनोगत

१०. आभार प्रदर्शन व पसायदान

**टीप : शि. प्र. मंडळी घटना नियम क्रमांक २२ नुसार गणसंख्येचे अभावी आजची शि. प्र. मंडळीची सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब केल्यानंतर अर्ध्या तासाने सभा सुरु करण्यात येईल व सदर सभेस गणसंख्या पूर्तीचे बंधन राहणार नाही.**

****

# सूचना

१. वरील क्रमणिकेतील विषयांसंबंधी सभासदांना काही सूचना पाठवायच्या असल्यास, त्या त्यांनी शि. प्र. मंडळीच्या कार्यालयाकडे **सोमवार, दिनांक २२ मे, २०२३ रोजी दुपारी ३.३०** वाजेपर्यंत लेखी अथवा shikshanapmandali@spm.education या ई-मेल आयडी वर पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार करता येणार नाही.

२. शि. प्र. मंडळीच्या सभासदांना वरील क्रमणिकेतील विषयांसंबंधी हवी असणारी माहिती सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ ते सोमवार, दिनांक २२ मे, २०२३ या कालावधीत शि. प्र. मंडळीचे कार्यालयात सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० पर्यंत उपलब्ध करून दिली जाईल.

३. तसेच शि. प्र. मंडळीचा लेखापरिक्षण अहवाल, ताळेबंद आपल्या अवलोकनार्थ शि. प्र. मंडळीच्या पुढील संस्थांमध्ये उपरोक्त मुदतीत उपलब्ध राहील.

१) पुणे : शिक्षण प्रसारक मंडळीचे कार्यालय, स. प. महाविद्यालय आवार, पुणे ४११ ०३०.
२) मुंबई : रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, लखमसी नप्पू रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९
३) सोलापूर : हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, १५६-ब, रेल्वे लाईन्स, स्टेशन रोड, डफरीन चौक, सोलापूर ४१३००१.
४) चिपळूण : इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर कोर्सेस अँण्ड रिसर्च (IMSCCR), सक्सेस चेंबर, भोगाळे, एस.टी. स्टँड जवळ, चिपळूण ४१५६०५.

त्यासंदर्भात आपणांस काही शंका असल्यास आपण प्रत्यक्ष शि. प्र. मंडळीचे कार्यालयात येऊन त्यासंबंधीची माहिती घ्यावी अथवा शि. प्र. मंडळीच्या कार्यालयाकडे लेखी अथवा shikshanapmandali@spm.education या ई-मेल आयडी वर उपरोक्त मुदतीत म्हणजे सोमवार, दिनांक २२ मे, २०२३ रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत कळवावे म्हणजे त्याबाबतचे उत्तर देणे सोयीचे होईल. आयत्या वेळेस माहिती मागितली तर ती देणे शक्य होत नाही, तरी सहकार्य करावे ही विनंती.

४. शि. प्र. मंडळीच्या कार्यालयास प्रत्येक महिन्यातील पहिल्या व तिस-या शनिवारी, तसेच आठवड्यात प्रत्येक रविवारी व इतर सार्वजनिक सर्वमान्य सुट्ट्यांचे दिवशी सुट्टी असते याचीही कृपया नोंद घ्यावी ही विनंती .

५. मा.सभासदांनी त्यांचे पत्त्यात बदल झालेला असल्यास तो संस्थेस अवश्य कळवावा. तसेच आपला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी कळवावा.

आज्ञेवरून,
**प्रा. डॉ. राधिका न. इनामदार**
चिटणीस, शि. प्र. मंडळी

**टीप : अहवाल शि. प्र. मंडळीच्या या www.spmandali.org.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.**
**सभासद यादी अद्ययावत करण्याचा फॉर्म शि. प्र. मंडळीच्या कार्यालयात उपलब्ध आहे.**

**वार्षिक साधारण सभा दिनांक २७ मार्च, २०२२ च्या सभेचा वृत्तांत**

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेची सन २०२१-२०२२ या वर्षावधीतील वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक २७ मार्च, २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता स. प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई हॉल मध्ये आयोजित करण्यात आली होती. या सभेत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

सर्वप्रथम संस्थेच्या चिटणीस डॉ. राधिका इनामदार यांनी सर्वांचे स्वागत केले, त्यावेळी त्या म्हणाल्या - सुस्वागतम्, सुस्वागतम्, सुस्वागतम्! शि. प्र. मंडळीच्या आजच्या वार्षिक साधारण सभेमध्ये व्यासपीठावरील सर्व मान्यवर, उपस्थित सर्व ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सदस्य यांचे शिक्षण प्रसारक मंडळीतर्फे आजच्या या सभेमध्ये मी सहर्ष स्वागत करते. मंडळी, आज २७ मार्च, बरोबर १० दिवस आधी -१७ मार्चला आपण होळीपोर्णिमा साजरी केली. होळी पोर्णिमा साजरी करतांना त्या होळीच्या आगीमधे आपण सर्व वाईट शक्ती, आचार-विचार यांचे दहन केलं आणि फाल्गुनी पोर्णिमेपासून सुरु झालेल्या वसंतोत्सवाने आपण सृष्टीच्या सृजनाला प्रारंभ केला. आज सगळीकडे नजर टाकली तर आपल्याला सृष्टीचे बदललेले रुप बघायला मिळते. मोग-याचा मंद सुवास, आंब्याचा मोहोर आणि रातराणीचा मादक सुगंध! या सुगंधमय वातावरणामधे आपल्याला प्रसन्नचित्ताने या सभेला सुरुवात करायची आहे. आपण सभेची सुरुवात सरस्वती स्तवनाने करणार आहोत. मी एस. पी. एम. पब्लिक स्कूलच्या शिक्षिका सौ. प्राजक्ता कुलकर्णी यांना सरस्वती स्तवनासाठी मंचावर आमंत्रित करते.

सरस्वती स्तवन झाल्यानंतर डॉ. इनामदार म्हणाल्या, मघाशीच मी म्हटले आजची तारीख २७ मार्च आणि १७ मार्चला आपण होळी पोर्णिमा साजरी केली. आजपासून बरोबर ५ दिवसांनी म्हणजे २ एप्रिलला हिंदू नववर्षाचा प्रारंभ होतो आहे.. आपणा सर्वांना गुढीपाडव्याच्या मंगलमय शुभेच्छा!

आपल्या घरामध्ये जर कोणी वडीलधारी माणसे आली तर आपण त्याचे यथोचित स्वागत आणि सत्कार करतो. आपली शि. प्र. मंडळी आणि तिच्या सर्व संस्था म्हणजे एक कुटुंबच आहे. त्यामुळे कुटुंब प्रमुखांचे स्वागत आणि सत्कार करणे हे आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणून मी आता आपल्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. जैन सर यांना विनंती करते की, त्यांनी आपल्या शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष मा. सदानंद फडके यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करावा आणि स्वागत करावे.

यानंतर उपाध्यक्ष मा. चितळे सर यांना मी विनंती करते की, आपल्या शिक्षण प्रसारक मंडळीचे उपाध्यक्ष श्री. गजेंद्र पवार आणि श्री. राजेंद्र पटवर्धन या दोघांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करावा. याप्रमाणे सत्कार झाले. या सत्कारानंतर डॉ. इनामदार यांनी चार वाजलेले आहेत आणि सभेला आवश्यक गणपूर्ती झालेली आहे म्हणून मा. अध्यक्षांना सभा सुरु करण्याची अनुमती मागितली, मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरु झाले.

क्रमणिकेवरील **विषय क्र. ०१** डॉ. राधिका इनामदार यांनी वाचून दाखविला : शिक्षण प्रसारक मंडळीची मागील वार्षिक साधारण सभा दि. ०७ ऑगस्ट, २०२१ ते आज अखेर शि. प्र. मंडळीच्या दिवंगत झालेल्या सभासदांना श्रध्दांजली वाहणे. याचबरोबर त्या पुढे म्हणाल्या की, जसे आयुष्यामध्ये सुख असते म्हणजे आयुष्याच्या जरीला सुखाची किनार असते तशी कधी-कधी दुःखाचीही किनार असते. आज सगळयात पहिला जो ठराव आपण करणार आहोत, मागची आपली ऑनलाईन सभा आणि आजची सभा या वर्षावधीमध्ये आपल्या काही सुहृदांचे, काही

जिवलगांचे, काही आत्पस्वकियांचे निधन झालेले आहे आणि काही लोकोत्तर व्यक्ती आपल्याला सोडून गेलेल्या आहेत त्यामुळे आपल्या जीवनामध्ये एक पोकळी निर्माण झालेली आहे. या सर्व आपल्या संस्थेशी संबंधित, प्राचार्य, सदस्य आणि ज्या लोकोत्तर व्यक्ती आपल्याला सोडून गेलेल्या आहेत त्यांना आपण भावपूर्ण श्रध्दांजली वाहणार आहोत. डॉ. इनामदार यांनी त्यांची नावे वाचून दाखवली : १) सीताराम अनंत सातपुते २) माधव शंकर सोमण ३) भांबुरकर प्रमोद गोविंद ४) न्यायमूर्ती वैद्य मकरंद शंकर ५) शरद माधव मेहंदळे याचबरोबर नू.म.वि. प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री. प्र. वि. पाटणकर, याचबरोबर भारतरत्न लता मंगेशकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, राहूल बजाज, कीर्ती शिलेदार, मराठी अभिनेते रमेश देव आणि चीफ ऑफ डिफेन्स बिपीन रावत तसेच आपल्या शिक्षण प्रसारक मंडळीचे सदस्य विष्णू तेलंग आणि प्रभावती भावे ही आपल्याला ज्ञात झालेली नावे आहेत. परंतु आणखीही असे काही अज्ञात असतील की ज्यांचे निधन झालेले आहे, अशा ज्ञात-अज्ञात सर्व सदस्यांना व लोकोत्तर व्यक्तींना आपण एक मिनिटभर उभे राहून श्रध्दांजली वाहूया. डॉ. इनामदार यांनी सर्वांना एक मिनिट उभं राहून श्रध्दांजली वाहण्याची विनंती केली. त्यानंतर उपस्थितांनी एक मिनिटभर उभे राहून निधन पावलेल्यांना श्रध्दांजली अर्पण केली तसेच श्रध्दांजलीचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ०१ विषय क्र. ०१ :** सन २०२१-२२ या वर्षावधीत ज्या सभासदांचे, हितचिंतकांचे, समाजातील मान्यवरांचे, संस्थेच्या आजी-माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे दुःखद निधन झाले त्यांच्या निधनाबद्दल सभेस अतीव दुःख होत आहे. शिक्षण प्रसारक मंडळी त्यांचे कुटुंबियांच्या दुःखात विनम्रपणे सहभागी आहे. सर्व दिवंगतांच्या आत्म्यास सद्गती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना !

यानंतर आजच्या सभेला काही सदस्य उपस्थित राहू शकत नाहीत त्यांनी फोन किंवा ई-मेल द्वारे आपली अनुपस्थिती कळवलेली होती, त्यांची नावे डॉ. इनामदार यांनी वाचली - १) श्री. मल्लीकार्जून निराळे, सोलापूर २) श्री. अरविंद देखणे, पुणे आणि ३) सौ. शालिनी देखणे, पुणे.

यानंतर डॉ. इनामदार यांनी शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. ॲड. सोहनलाल जैन यांना आपले मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली.

**मा. ॲड. सोहनलाल जैन यांचे प्रास्ताविक भाषण :**

संस्थेचे अध्यक्ष सदानंद फडकेजी, नियामक मंडळाचे उपाध्यक्ष चितळेजी, संस्थेच्या व नियामक मंडळाच्या सेक्रेटरी सौ. इनामदार मॅडम, संस्थेचे उपाध्यक्ष गजेंद्रजी पवार, राजेंद्रजी पटवर्धन, मॅनेजींग कौन्सिलचे सर्व माझे सहकारी व उपस्थित सर्व सभासद बंधु-भगिनींनो! विशेष उल्लेख करावा म्हणजे संस्थेचे स्टॅच्यूटरी ऑडिटर, ज्यांना अत्यंत बिझी शेडयूल असूनही त्यांना रिक्वेस्ट केल्यानंतर या कामासाठी ते आलेत आणि आपलं उत्तर काय असेल तर ते देता यावे म्हणून ते उपस्थित आहेत. आपल्या सर्वांचे मी अभिनंदन करतो. इनामदार मॅडम म्हणाल्या आहेत नुकताच होळीचा सण होऊन गेला आहे, ज्या-ज्या वाईट गोष्टी होत्या त्या तिथेच आपण जाळून टाकल्या आहेत किंवा आपण विसरावे असा तो प्रकार असतो. मला वाटते दोन वर्ष कोरोनाने आपल्यावर बंधने घातली होती वा आपल्या लिबर्टीवरती अंकूश आणला होता, ते सुध्दा नाहीसे झाले आहे किंवा भारतातून हद्दपार झाले आहे असे म्हणायला हरकत नाही. आजची परिस्थिती अशी आहे की आपण कोरोनामुक्त आहोत आणि म्हणूनसुध्दा सर्व भारतवासीयांचे अभिनंदन करायला हरकत नाही. या AGM च्या निमित्ताने मागच्या AGM

च्या वेळेला अध्यक्षांनी काही सूचना दिल्या होत्या त्या संदर्भामध्ये कुठपर्यंत compliance झाला आहे ते त्यांच्यासमोर सांगणे गरजेचे आहे. त्याच्यानंतर काय झाले आहे, कुठल्या Achievement आहेत यासुध्दा गोष्टी आपल्याला बोलता येतील. प्रथम म्हणजे, कोरोनाच्या परिस्थितीत अनेक संस्था या डबघाईस आल्या, अध्यक्ष महाराज इतके सांगतो की आपली संस्था डबघाईस तर आलीच नाही पण आपली financial स्थिती आणखी सुधारली. त्याच कारण संस्थेच्या जे सर्व शाखांचे जे स्टेटस आहे किंवा ज्या achievements आहेत, जे reputation आहे, जो परफॉरमन्स् आहे हे consistent असल्याने कुठे ॲडमिशनमध्ये कमतरता झाली नाही किंवा आपण सर्वांना कुठल्याही प्रकारचे retrenchment न करता किंवा कुणालाही कामावरुन न काढता सर्वांना योग्य प्रमाणामध्ये त्यांची जी काही salary होती तीसुध्दा देण्यात आली आहे. आणि मला असं वाटत की, ही संस्थेसाठी achievement आहे. या दोन वर्षात-कोरोना काळात कोणतीही कारण न देता जे आपल्या संस्थेबरोबर काम करणारे आहेत, ज्यांना मी सेवक म्हणणार नाही ते पाईक आहेत, founder आहेत, foundation आहेत त्या सर्व जणांनी सहकार्य केले आणि संस्थेचे नाव जे होते किंवा जे आहे त्याप्रमाणेच काम करत राहिले आणि म्हणूनच आपण आज reputation & achievement मेंटेन करु शकलो. काही गोष्टी ठळक याप्रमाणे घडल्या आहेत आपण ज्या हॉल मध्ये यंदा बसलोय- मिटींग हॉल मध्ये मला वाटते या हॉलच्या रिन्यूएशन नंतर आपली ही पहिलीच AGM इथे होते आहे. हे rennovation करतांना सतीश पवार, जयंत किराड आणि इतर सर्वांनी जे सहकार्य केले ते पाहिले की मला वाटते की त्यांनी त्यांची घरे बांधायला जितका वेळ दिला नसेल तेवढा वेळ त्यांनी इथे सर्व बाबतीमध्ये दिला होता. त्याच्याआधी अशोक वझे व त्यांच्या इतर सहका-यांनी स्विमींग पूलचे केलेले काम आपल्याला माहित आहेच, टँक जो आपला बांधून झालाय तो. Achievement एक-एक जर सांगायची तर त्यासाठी मला वेळ पुरणार नाही. वेळेची मर्यादा असते. प्रामुख्याने ठळक गोष्टी ज्या असतात त्या मी सांगतो. त्या म्हणजे आपल्या एस. पी. कॉलेजचा विद्यार्थी कौशल तांबे याला world-cup च्या Under-19 च्या क्रिकेट टिम मध्ये स्थान मिळाले. त्याच्या आधी Asian-Cup मध्ये खेळल्यानंतर सुवर्णपदक ज्या टिम ला मिळते ते सुवर्णपदक मिळाले होते. आपले रणजीत चामले म्हणून Sports Director जे आहेत एस.पी. चे त्यांना 'The Best Coach' ॲवार्ड मिळालं आणि इतर गोष्टींचे कौतुक झाले आणि खरोखरच त्यांनी स्पोर्टस् मध्ये स्टुडंट घडवायला पाहिजेत ते काम ते व्यवस्थित करत आहेत. आपल्याकडे वेलिंगकर स्कूल जे आपण म्हणतो त्या इन्स्टिटयूटची funds आणि बाकीच्या सर्व गोष्टीच्या परफॉरमन्समधे यावर्षीसुध्दा अत्यंत उत्तम रेव्हेन्यू आहे, परफॉरमन्स व अचिव्हमेंट आहे. Ranking मधे सुध्दा यावर्षी ७५ वे ranking आहे जे All over India, NIRF चे आहे ते अनेक वर्ष आपल्याला मिळत गेल आहे. पोदारच जे performance म्हणजे consistently पहिलं येण्याचा जो मान आहे तो पोदारने continue ठेवलाय यंदा सुध्दा. युथ फेस्टिव्हल जे मुंबई युनिर्व्हसिटीचे होत असते- त्यात मुंबई युनिर्व्हसिटीच्या अखत्यारित साधारणपणे ७०० ते ८०० कॉलेजेस आहेत - परंतु युथ फेस्टिव्हल मध्ये पहिला क्रमांक रुईया कॉलेज आणि दुसरा क्रमांक पोदार कॉलेज. तेव्हा सांगायच आपल्याला इतकच आहे की, Education, Sports, Cultural activities कुठेही आपण कमी पडत नाही आणि आपला presence च नसतो तर आपला performance देखील असतो. तेव्हा या सर्वांचे संबंधीत प्रिन्सिपल्स्, शिक्षक, प्रोफेसर्स-प्राध्यापक जे या गोष्टीला मॉनिटर करतात -ते सर्वजण अभिनंदनास पात्र आहेत. इतर गोष्टी ज्या आहेत Presentation वगैरे ते होईल. परंतु We School ची आणखी एक अचीव्हमेंट आहे "We School has received the award of Highest Rating for Innovation by Education Minister of Govt. of India" जर मी academic आणि बाकीच्या गोष्टीची पाने वाचत बसलो तर मला वाटते तर हे दोन तास तशाच प्रकारे जातील. परंतु आणखी काही गोष्टी जर सांगायच्या तर या period मध्ये म्हणजे मागची जी ऑनलाईन जनरल बॉडीची मिटींग झाली होती, त्याच्या नंतर, जर आपण पाहिलं तर SPM Primary School

ची अंदाजे ४० हजार स्के.फूट ची with 25 classrooms ची स्कूल बिल्डिंग पूर्ण झालेली आहे. मिहिर प्रभुदेसाई आणि त्यांच्या कमिटी मेंबर्सनी तर कष्ट घेतलेच आहेत पण त्यांच्याबरोबर त्यांचे प्रिन्सिपल आणि इतर सर्वांनी पर्सनल लक्ष घालून इतर गोष्टी केल्या आहेत. एस.पी.एम. स्कूल, सोलापूर चे जे आहे -इंग्लिश मिडीयम शाळा त्याच्या कामाला नुकतीच सुरुवात झालेली आहे. मा.चितळे साहेबांच्या हस्ते नुकतेच भूमीपूजन झाले आहे. त्यानंतर जर म्हणाल तर दुसर अचिव्हमेंट जे आज आपण पाहतो ते आहे, मॅनेजमेंट इन्स्टिटयूटमध्ये ज्या निम्म्या जागा रिकाम्या राहतात, परंतु पुण्यातील आपल्या नारळकर इन्स्टिटयूटमध्ये काही गॅप पडली होती, ती या दोन वर्षात पूर्ण भरली गेली आहे एम.बी.ए. चे हे दुसरं वर्ष असून आपल्या सर्व सीटस् पूर्ण भरुन झालेल्या आहेत आणि कदाचित this is a recognition of the institute, its director, Dr. Abale आणि इतर सर्व तिथला स्टाफ जो आहे त्यांच आहे. श्रीभाऊंच्या नेतृत्वाखाली नारळकर इन्स्टिटयूट अत्यंत चांगल्या प्रकारे काम करत आहे. रुईया कॉलेजला DBT – Dept. of Biotechnology कडून १.८ करोड Research PG साठी grant मिळाली आहे. पोदार कॉलेजने रुसा च्या अंतर्गत २.५ कोटी रुपयांची जी ग्रँट मिळाली ती successfully पूर्णपणे वापरली आहे आणि नुकतेच त्यांनी indication दिले आहे की पुढची ग्रँट, अजून additional पोदारलाच मिळणार आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, इतर कॉलेजेस जे आहे त्यांनी सुध्दा, रुईयाने grant पूर्णपणे वापरली आहे, तशी इतरांनी जो रुसाच्या under grant आहे तो education standard सुधारण्यासाठी ती पूर्णपणे वापरलीच पाहिजे. वेळच्या वेळी ते झालंच पाहिजे. सर्वात महत्त्वाचे या period मध्ये जे आहे ते आम्ही कॉन्सिल मेंबर्सनी एक निर्णय घेतला आहे तो म्हणजे स्टॅटयूटरी कमिटीज असतात, स्कूल कमिटीज असतात, इतरही असतात परंतु त्याच्या बरोबर सर्वांचा फायदा मिळावा, सर्वांच्या अनुभवाचा की जे education field मधे असतात, administrative field मधे असतात वगैरे म्हणून प्रत्येक शाळा आणि प्रत्येक कॉलेजच्या unit ला एक Advisory Committee तयार करावी की जेणेकरुन त्यांच्या अनुभवाचा फायदा आपल्याला मिळेल आणि स्टँडर्ड जो आहे तो मेंटेन करण्यासाठी सुध्दा त्याचा फायदा आपल्याला निश्चितपणे मिळू शकेल. आणखी एक गोष्ट आपल्या सर्वांसाठी की जी अल्टीमेटली महत्वाचे आहे की आपण किती गोष्टी करायच्या म्हटले तरी revenue शिवाय काम होत नाही आणि revenue lawfully in a legal manners activities वाढवून संस्थेच्या ध्येय धोरणाप्रमाणे कोर्सेस राबवून मिळविण्याचा प्रयत्न करणे हा आपला अधिकारच आहे आणि त्यासाठी consistently आपण ground utilization, sports facility utilization, नवीन नवीन कोर्सेस राबवत आहोत. आत्ताच पोदार मध्ये सांगण्यात आल की यावर्षी पासून BSC-Data analytics आणि BSC-logistic management हे नवीन कोर्सेस आपण तिथं सुरु करणार आहोत. आपल्याला माहिती असेल तर बॉम्बे मध्ये पोदार, रुईया आणि वेलिंगकर यांना सर्वात मोठा ताप असेल तर ॲडमिशन्स. प्रत्येकाच्या रिक्वेस्ट असतात, पण ते देता येत नाही. याच कारणाने they have maintained their standard. पण ते नुसतं standard maintain करुन थांबत नाहीत तर नवनवीन प्रयोग करतात की जेणेकरुन विद्यार्थ्यांना फायदा व्हावा, समाजाला फायदा व्हावा. नवीन कोर्सेस with the present change सुरु व्हावेत आणि असे हे accept करीत असल्याने तिथं ॲडमिशन साठी डिमांड असते. फक्त नाव एकदा असत पण ते remain it on top आपल्याला माहिती असेल अध्यक्ष महाराज तर, रुईयाला आणि पोदार ला मुंबईच्या युनिर्व्हसिटी अंतर्गत सर्वात जास्ती ॲप्लिकेशन्स या दोन्ही कॉलेजला consistently आहेत. तर it is एकदा मिळू शकेल आपल्याला पण ते जेव्हा consistently मिळते तेव्हा त्या कॉलेजचा परफॉरमन्स निश्चितपणे समाजाने accept केलेला असतो. आजच्या या मिटींग मध्ये शेवटी सांगायचे म्हणजे मॅनेजिंग कौन्सिल एकटी काम करु शकत नाही. व्यक्ती एकटी काम करु शकत नाही. आम्हाला नेहमीच प्रत्येकाचा advice, suggestions मिळत असतात आणि त्या मिळत रहाव्यात. सुदैवाने आज विजय भावे आहेत, डॉ. वळसंगकर आहेत, कुलकर्णी सर आहेत, सोलापूरचे बाकीचे

आहेत त्यांना मी विनंती करीन की शेवटी आम्ही तुमच्या बरोबर आहोत, तुम्ही आमच्या बरोबर आहात. संस्था आपली आहे आणि योग्य ठिकाणी योग्य त्या सूचना आणि advice कुठल्या फॉर्म मध्ये द्यायच्या त्या बाकीच्या गोष्टी आहेत.. आपणा सर्वांचे सहकार्य म्हणून आज ही achievements आहेत. मी जी आज दाखवली ती मी अजिबात म्हणणार नाही की अध्यक्षांची किंवा मॅनेजिंग कौन्सिलची अचिव्हमेंट आहे, ही शिक्षण प्रसारक मंडळीची achievement आहे. न.म.जोशी सर आहेत, म्हणजे ते तर example च आहेत की age is not challenge for anybody त्यांच्याकडे पाहिलं की for all purposes, आमचे चंपालालजी संघवी आहेत जे आज आलेत. एकाची का सर्वांची नाव घ्यायची तर प्रत्येकाचे contribution तेवढेच valuable असते. प्रत्येकजण मी म्हणीन all credit is given to for all success, performance, it is all to general members, general body members. सुभाषजी परमारजी त्यांचेकडे education चे जे नवीन उपक्रम चालू केले आहेत ते सुध्दा एक शिक्षण संस्था चालवत आहेत. सर्वांच सहकार्य आहेच. उपाध्यक्ष आमचे गजेंद्र पवार, राजेंद्र पटवर्धन योग्यवेळी त्यांना ज्या सूचना द्यायच्या असतात, त्या communicate करतात आणि निश्चितपणे त्याचा विचार केला जातो. तेव्हा मी आपल्याला इतकचं म्हणेन की if there is some achievement there is of all & if there is something is remain that is of mine. आता आपण काही नवीन गोष्टीचं सुध्दा म्हणजे Expansion साठी आपण जे काही गोष्टी करणार आहोत त्याचा विचार करणार आहोत. कारण की आहे तिथं थांबण तेवढयावर चालणार नाही. तेव्हा Research Centre म्हणा, Medical College म्हणा किंवा Engineering, Professional Colleges म्हणा either by acquisition or totally new one निश्चितपणे त्याच्यावर विचार चालू आहे. आपल्याला माहिती आहे की, आपल्याला काही गोष्टी मान्य कराव्याच लागतील की जे काही revenue collection आहे त्यामध्ये वेलिंगकर आणि एस.पी.एम. पब्लिक स्कूल त्याबरोबर आता एसपीएम-एस.एस.सी. बोर्ड स्कूल, मग इतर संस्था म्हणजे आता नारळकर वगैरे सर्वांच्या मध्ये competition च आहे की आम्ही किती चांगल काम करु शकतो. प्रत्येक युनिट मध्ये आणि निश्चितपणे रुईया, पोदार, एस.पी. कॉलेज अशा या सर्वांच्या साठी आपल्या सूचना या स्वागतार्ह राहतील. कारण नॅशनल एज्युकेशन पॉलिसी आपल्या पंतप्रधानांना जी अपेक्षित आहे, आपण नशीबवान आहोत की आपल्याला performing, world class performing प्रधानमंत्री मिळाले आहेत. म्हणून मन की बात पासून एक-एक policy आपल्या समोर ठेवतात तेव्हा बेसिकली म्हणजे अगदी बेसिक रुप पासून ते म्हणतात की job oriented त्याला शब्द वापरत नाहीत की नोकरी पाहिजे किंवा नोकरी द्यायची किंवा काय करायचं परंतु इतर गोष्टींसाठी the best talent to be produced by the education system आणि त्यासाठी आपणही त्यांच्या बरोबर जे काही आपणाला करता येईल ते करण्याची गरज आहे. आपल्या अध्यक्ष महाराजांनी दोन सूचना फार पहिल्यापासून केलेल्या आहेत त्यांच्यात पाहिजे तेवढी प्रगती झाली नाही याची खंत मला आहे. एक आहे local language चं जितक करायला पाहिजे होत तेवढ अजून झाल नाही. मातृभाषा आता त्यासाठी आपण काय म्हणू शकतो तर आम्ही एक सुरुवात केली आहे. best infra तयार करणे म्हणजे दोन्हीही गोष्टी लागतात चांगले शिक्षक आणि best infra. कुठल्या तरी एकाने सुरुवात करायला पाहिजे. आमच्या पराग ठाकूरांनी नू.म.वि. प्रायमरी शाळा जी आहे, प्रभात टॉकीज समोरची तिचे काम त्यांनी मिशन म्हणून हातात घेतलेले आहे. आता जर पाहिले तर तुम्हाला कळेल, आत्तापर्यंत सर्वजण म्हणत होते की मी तिथं होतो, पण तुमचे नातू किंवा मुलं आहेत का तिथं? पण आत्ताच infra तुम्ही पाहिले की पुन्हा आपल्याला temptation येईल की पुन्हा आपल्या मुलांना मराठीतून शिक्षण द्यायचे असेल तर निश्चितपणे तिथे आपल्याला पाठवता येईल. म्हणून परागचे सुध्दा आणि सुधीरचे सुध्दा कौतुक आहे. कारणमला वाटत आपल्या मुलींच्या शाळेचं काम काळकर पाहतात. त्यामुळे प्रत्येकाचेच contribution आहे. Everybody working as mission की ही माझी शाळा आहे आणि मला हे केलं पाहिजे. तेव्हा आपण मराठी

लँग्वेज साठी आणखी मराठी पुस्तकं, निबंध स्पर्धा या अशा गोष्टी आपण घ्यायला पाहिजेत अस की त्यातून acceptability वाढणार आहे की मातृभाषेतून शिक्षण घेतले तर आपली प्रगती आणखी फास्ट होऊ शकते. या गोष्टीचा सुध्दा आपण प्रयत्न करत आहोत. मात्र अडचणी प्रत्येक गोष्टीमध्ये असतात पण आपल्या सर्वांच्या सहकार्याने निश्चितपणे शिक्षण प्रसारक मंडळी आपल्या अपेक्षेप्रमाणे उत्तम दर्जाचे शिक्षण देण्याचे काम सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून निश्चितपणे करणार आहे अशी मी, माझ्या वतीने व कौन्सिल च्या सर्व सहका-यांच्या वतीने आपल्याला ग्वाही देतो आणि माझं बोलणं इथे थांबवतो. जयहिंद ! जय महाराष्ट्र!

यानंतर डॉ. इनामदार यांनी मा. जैन सरांचे आभार मानले. त्यावेळी त्या म्हणाल्या आत्ताच मा. जैन सरांनी आमच्या संस्थेच्या ज्या शाळा, महाविद्यालये आहेत त्यांच्या प्रगतीचा एक आढावा आपल्या समोर मांडला. अर्थातच सर्व संस्थाप्रमुख सुखावले असतील आणि त्यांच्या मनात हाही विचार आला असेल की, आम्ही प्रगती करतो आहोतच पण त्याच्यासाठी जो भरघोस पाठिंबा लागतो, जे मार्गदर्शन लागतं ते आम्हाला नियामक मंडळाचे सदस्य, मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष नेहमीच देत असतात. सदैव तत्पर अशी ही एक सेवा आपण म्हणू कारण याच्यासाठी कोणत्याही प्रकारचं मानधन घेतलं जात नाही. आपला संपूर्ण वेळ हे सदस्य आमच्यासाठी देत असतात. सर आपणा सर्वांना आमच्या संस्थाप्रमुखांतर्फे मनापासून धन्यवाद!

आता आपण क्रमणिकेवरील **विषय क्र. ०२** कडे येऊ या, डॉ. इनामदार यांनी विषय क्र. ०२ वाचून दाखवला : शिक्षण प्रसारक मंडळीच्या दिनांक ०७ ऑगस्ट २०२१ च्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

मा. श्री. सुधीर काळकर यांनी विषय क्र. ०२ वाचून तो मंजूर करण्यात यावा असे सूचविले आणि त्यास मा. श्री. पराग शशिकांत ठाकूर यांनी अनुमोदन दिले.

वृत्तांत कायम करण्याचा ठराव मंजूर करावा का असे डॉ. इनामदार यांनी मा. अध्यक्षांना विचारणा केली. यावर मा. सदानंद फडके, अध्यक्ष, शि. प्र. मंडळी यांनी सभेस विचारले की याबाबत कोणाला काही म्हणावयाचे आहे का? कोणाला काही हरकत नसेल तर हा वृत्तांत कायम करण्यात आला असे मी जाहिर करतो असे सांगितले. त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ०२ विषय क्र. ०२ :** शिक्षण प्रसारक मंडळीच्या दिनांक ०७ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत कायम करण्यात यावा असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

इनामदार मॅडम : आता आपण **विषय क्र. ०३** कडे येऊया. आत्ताच जैन सरांनी आपल्या भाषणामध्ये आमच्या संस्थेच्या विविध शिक्षक, विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना जी अॅवार्डस् मिळालेली आहेत त्याचा उल्लेख केला. मी आता एकदा फक्त त्यांची नावे वाचते - १) स. प. महाविद्यालयातील विद्यार्थी कौशल तांबे, २) स. प. महाविद्यालयाचे स्पोर्टस् डिरेक्टर चामले सर ३) टिळक शिक्षण महाविद्यालयाचे दुर्गाडे सर, ज्यांना पीडीसीसी बँकेचे चेअरमन म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे तसेच आपल्याला अभिमानास्पद आणखीन एक गोष्ट या काळामध्ये घडलेली आहे की नू.म.वि. प्रशालेचे माजी विद्यार्थी श्री. सूरज मांढरे यांची नुकतीच शिक्षण आयुक्तपदी नियुक्ती झालेली आहे. आपण सगळयांनीच संस्थेच्या या बहुमानाबद्दल जोरदार टाळयांनी त्यांच अभिनंदन करुया. धन्यवाद!

इनामदार मॅडमनी मा. अध्यक्षांना अभिनंदनाचा ठराव मान्य आहे का असे विचारले असता त्यांनी त्यास संमती दर्शविली व अभिनंदनाचा ठराव पुढीलप्रमाणे मंजूर करण्यात आला.

**ठराव क्र. ०३ विषय क्र. ०३ :** अहवाल काळात संस्थेच्या हितचिंतक, सभासद तसेच संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी व विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या बहुमानांबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

यानंतर **विषय क्र. ०४** इनामदार मॅडमनी वाचून दाखविला : शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल, मा. लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या हिशेबांची पत्रके या बाबतीतील ठराव संमत करणे.

यावर मा. श्री. केशव वझे यांनी विषय क्र. ०४ वाचला व तो संमत करण्यात यावा असे सूचविले. त्यास श्री. सतीश पवार यांनी अनुमोदन दिले.

मा. अध्यक्षांनी याबाबत कोणाला काही बोलायचे आहे का? असे विचारले. कोणास हरकत नसेल तर हा ठराव सर्वानुमते संमत झाला असे मी जाहिर करतो असे सांगितले. त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव मंजूर झाला.

**ठराव क्र. ०४ विषय क्र. ०४ :** शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल, मा. लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या हिशेबांची पत्रके या बाबतीतील ठराव संमत करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.(सन २०२०-२१ चा अहवाल हिशेब पत्रकांसह शि. प्र. मंडळीच्या www.spmandali.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे)

यानंतर मा. इनामदार यांनी **विषय क्र. ०५** कडे जाऊया असे सांगून सदर विषय वाचून दाखवला. त्याबाबत श्री. सुनील जोशी यांनी मा. नियामक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन २०२२-२०२३ या वर्षावधीचे हिशेबांचे तपासणीसाठी लेखापरिक्षक म्हणून मेसर्स डी. आर. बर्वे अँड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांची नव्याने नियुक्ती करण्यात यावी असे सुचविले. त्यास श्री. राजेश पटवर्धन यांनी अनुमती दिली.

मा. अध्यक्ष अ‍ॅड. फडके सर यांनी यावर कोणाला काही सूचवायच आहे का? असे विचारले. मग मेसर्स डी. आर. बर्वे अँड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांची पुढील वर्ष २०२२-२३ या वर्षावधीसाठी हिशेबतपासणीसाठी लेखापरिक्षक म्हणून नियुक्त करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला करण्यात आला असे सांगितले.

**ठराव क्र. ०५ विषय क्र. ०५ :** मा. नियामक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन २०२२-२०२३ या वर्षावधीचे हिशेबांचे तपासणीसाठी लेखापरिक्षक म्हणून पुढीलप्रमाणे नव्याने नियुक्ती करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | लेखापरिक्षकाचे नांव | तपशील |
|---|---|---|
| १ | मेसर्स डी. आर. बर्वे अँड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे | शि. प्र. मंडळीचे कार्यालय आणि शि. प्र. मंडळीच्या पुणे, मुंबई, सोलापूर, श्रीक्षेत्र परशुराम आणि चिपळूण येथील सर्व संस्थांचे लेखापरिक्षण आणि शि. प्र. मंडळीच्या सर्व संस्थांच्या हिशेबाचे एकत्रीकरण. |

यानंतर डॉ. इनामदार **विषय क्रमांक ०६** चर्चेला घेतांना सांगितले की – विषय क्र. ०६ जो आहे, आपली शिक्षण प्रसारक मंडळीची जी घटना आहे त्याच्या मध्ये आपल्याला काही दुरुस्ती करावयाची आहे तर त्या संदर्भामध्ये त्याची पार्श्वभूमी व घटना दुरुस्तीच्या बाबत मी प्रभुदेसाई सरांना विनंती करते की त्यांनी आपली भूमिका मांडावी.

**ॲड. मिहिर प्रभुदेसाई** : सन्मानीय व्यासपीठ, सन्मानीय सभासद. संस्थेच्या गेल्या १३० वर्षांपेक्षा जास्त अशा प्रवासामध्ये आपले जे Constitution आहे, घटना जी आहे त्याची शेवटची Ammendment ही २००८ साली झाली आहे. त्याच्यानंतर जी आली ती National Education Policy: twenty-twenty आहे किंवा नवीन विद्यापीठं, नवीन Higher Education मधला aspects येत आहेत हे सगळं बघता शिक्षण प्रसारक मंडळीची घटना जी होती त्याच्यामध्ये काही आवश्यक ते बदल होणे गरजेचे होते. कारण नवीन एज्यूकेशन पॉलिसी ही adopt करतांना या सगळया गोष्टी रेकॉर्ड वर येणं त्याचं detailing आहे. सरकारने परवा घोषित केलं की ही जी Digital University आहे, Cluster University आहे त्याचप्रमाणे Incubation centres आहेत ती सुरु करायची तर देशात आणि परदेशात आपण नवीन अभ्यासक्रम जर चालू करायचे झाले तर ती घटनेमध्ये तरतूद असणं आवश्यक होतं. आणि मा. नियामक मंडळाने यावर सखोल विचार करुन घटनेमध्ये काही दुरुस्ती करण अपेक्षित आहे असा विचार पुढे आला. आणि घटना दुरुस्ती आपण करावी, त्याचे wordings आपल्या सगळयांसमोर ठेवणे हे आम्हाला अपेक्षित वाटलं कारण तो जीबी चा अधिकार असतो. कुठलीही घटना दुरुस्ती करणे हा Governing Body चा अधिकार आहे. त्यामुळे घटनेमध्ये काय नमूद केलं आहे ते आपणा समोर मांडत आहे. पहिल्यांदा मी ते इंग्रजीमधे ठेवत आहे कारण आपली मूळ घटना इंग्रजीमधे आहे.

The Managing Council of Shikshana Prasaraka Mandali, Pune has recommended that the following text be incorporated in the Aims & Objects of the S. P. Mandali's Constitution in rule no. 02 (नं. ०२ जे आपण म्हणतो त्याच्या मध्ये हे incorporate करायचं म्हणतोय, मी त्यातले wordings वाचतो ते आपण लक्षपूर्वक वाचावेत आणि काही suggesstions असतील तर त्याच्यावर आपण चर्चा ही करु शकतो.) "Considering the needs of the global and Indian Education environment and the NATIONAL EDUCATION POLICY 2020 of Government of India, to establish Schools, Colleges, Vertical Universities, Online Universities, Incubation Centres, Startup Centres, allied Educational Programmes and Projects etc. & Section 8 Company if required in India and abroad. Also to establish new institutions, allied Programmes and Projects in India and abroad as per the need of the hour".

कारण त्या-त्या गोष्टी या तिथे आपल्याला incorporate करुन नवीन गोष्टींकडे जाणे आवश्यक आहे. मी आता मराठीतलं वाचतोय

'भारत सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरुन व जागतिक व देशपातळीवर शैक्षणिक दृष्टया गरजेचा विचार करुन भारतात व परदेशात शाळा, महाविद्यालय, व्हर्टिकल (Vertical) विद्यापीठ, ऑनलाईन विद्यापीठ, Start-up व Incubation Centre इत्यादी आणि आवश्यकतेनुसार सेक्शन ८ कंपनी, अन्य प्रकारच्या संस्था, शैक्षणिक प्रकल्प व उपक्रम सुरु करणे. त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता वाढ व विस्ताराच्या दृष्टीने वेळोवेळी गरजेनुसार आवश्यक त्या संस्था, प्रकल्प व उपक्रम भारतात व परदेशात सुरु करणे'. या मजकूराचा समावेश शि. प्र. मंडळी घटना नियम क्रमांक ०२ मधील हेतू व उद्दिष्टे यामध्ये करण्यात यावा अशी शिफारस मा. नियामक मंडळाने साधारण सभेस केली आहे त्याचा विचार करणे.  धन्यवाद!

यानंतर श्री. राजेंद्र परशुराम पटवर्धन यांनी या घटना दुरुस्तीस अनुमोदन दिले. सौ. इनामदार यांनी मा. प्रभुदेसाई सर आणि पटवर्धन सर या दोघांना धन्यवाद देऊन या विषयावर कोणास बोलायचे का असे विचारले. त्यावर शि. प्र. मंडळीचे सभासद श्री. प्रसाद जोशी यांनी आपले विचार मांडले.

घटना दुरुस्तीबाबत **श्री. प्रसाद जोशी** म्हणाले की, नमस्कार, हा जो विषय क्र. ०६ आहे, त्यात National Education Policy चा उल्लेख झालेला आहे. तर याला अनुसरुन तिथे Vertical विद्यापीठ जे म्हटलयं, तर Vertical या शब्दाचा समावेश करुन त्याला limitation टाकायची का हा पहिला विचार मी मांडतो. कारण नुकतचं महाराष्ट्र शासनाने २८ जानेवारी रोजी माशेलकर समितीच्या शिफारशी accept केलेल्या आहेत आणि लवकरच त्याचा शासन निर्णय अपेक्षित आहे. ज्या संस्थांना ७० वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्याचं शासनाने प्रस्तावित केल आहे. फक्त ते कोणत्या प्रकारच विद्यापीठ असेल त्याबाबत स्पष्टता नाही. म्हणून vertical हा शब्द घालून त्याला limitation ठेवायची का हा पहिला प्रश्न आहे. दोन नंबर याच्या मध्ये Higher Education Cluster या शब्दाचा समावेश करता येईल का? कारण युजीसी ने Draft suggest केला आहे नुकतेच त्यात त्यांनी एकूण ०४ प्रकार दिलेले आहेत.Collaboration, Cluster, Merger आणि नवीन Department चालू करणे. यातला पहिला नंबर आणि चार नंबर याच्याशी आपला फारसा संबंध नाही म्हणून ते घेतलं नाही तरी चालेल. पण Higher Education Cluster ही टर्म नवीन एज्यूकेशन पॉलिसी मध्ये आहे. त्याचा समावेश आपल्याला या यादीत करता येईल का?

यानंतर **डॉ. सतीश वळसंगकर** बोलण्यासाठी उभे राहिले व म्हणाले - मी, डॉ. वळसंगकर घटनेमध्ये आपला सभासद हा २१ वर्षाचा असला पाहिजे असं लिहिले आहे, पण कुठेही He should be citizen of India असा उल्लेख नाही. तर तो टाकणे गरजेचं आहे अस मला वाटत याचा आपण विचार करावा. दुसरं सूचक व अनुमोदक दोघेही कौन्सिलरचं असतात. त्यावेळी आमच्या सारख्यांना ही काही म्हणायच असते किंवा अनुमोदन द्यायचे असते तर ते देण्याची परवानगी द्यावी.

**सभासद जे. जे. कुलकर्णी, सोलपूर** - तुमचे ठराव वाचून झाल्या-झाल्या या दोघांनी उठून पटकन अनुमोदन दिले. बाकीच्यांना बोलायचं होते ना! आता काय झालयं त्यांनी ठराव पास करावा यांनी अनुमोदन द्यावे. This

is wrong procdure आम्हा तिघा-चौघांना बोलायचं होते. आमचे ऐकून घेऊन ठराव पास करायला पाहिजे होता आणि दुसरं म्हणजे याच्यात Managing Council of Shikshana Prasaraka Mandali has recommended यामधे & subordinate educational Institute असा शब्द घालता आला तर घाला.

**अध्यक्ष, ॲड. फडके :** ठराव मांडल्यानंतर त्याला सूचक पाहिजे आणि सूचक आल्यानंतर अनुमोदन मग तो ठराव चर्चेला येतो. अनुमोदन दिल्यामुळं ठराव संमत होत नाहीये. आणि म्हणून आत्ता आपण ही चर्चा करत आहोत. चर्चेमध्ये आपण आपले सगळे विचार, सगळे मुद्दे मांडू शकता. मी नाव का घेतोय तर अमूक-अमूक सभासदाने असे विचार मांडले यासाठी. सूचक-अनुमोदक झाल्यानंतर मग तो चर्चेला येतो. अजूनही या विषयावर कोणाला काही बोलायचय? मला असं वाटत की, प्रसाद जोशींची जी सूचना आहे ती अतिशय योग्यच आहे. पण बोलतांना त्यांनी सांगितलं की बाकीच्या दोन आहेत त्या आपल्याशी संबंधीत नाहीत म्हणून घातले नाहीत तरी चालतील. पण माझं अस म्हणणं आहे की आत्ता आपण जर घटनेमध्ये बदल करत आहोत तर ते जे दोन सरकारने सुचवलेले तेही घातले तर त्यामुळे नुकसान काही नाहीये. आपल्याला अजूनही विस्तार करायला ज्याला आपण म्हणतो तो वाव आहे. तेवढयाकरता त्यांची जी सूचना आहे ती अमलांत आणावी त्याप्रमाणे त्याचा समावेश यामध्ये करुन दुरुस्ती करावी.

यावर **डॉ. उदय साळुंखे,** संचालक - प्रिं. एल.एन. वेलिंगकर इन्स्टिटयूट, मुंबई आणि प्रशासकीय मंडळ सदस्य यांनी आपले विचार मांडले की, प्रसाद जोशी सरांची सूचना जी आहे ती खूपच महत्त्वाची आहे. परंतु Vertical University ची concept हा विषय जेव्हा discussion ला आला होता तो specifically metros मधे जिथे जागेची खूपच कमतरता आहे, जिथं Horizontical spread आपल्याला करता येणार नाही तिथेच vertical आपण हे करावं, वाढवून द्यावं आणि vertical side ने वाढवावं म्हणून कमिटी जी होती त्या कमिटीने global थोडं Brenchmarking केलं होतं. पण आपण जे म्हणता ते योग्यच आहे आणि माशेलकर समितीचा रिपोर्ट येतोय त्याप्रमाणे आणि ब-याच अशा गोष्टी ज्या future च्या आपल्याला दिसणार नाहीत. Deemed, Private University आलेल आहे, vertical आलेलं आहे, cluster आपण मांडलेलच आहे. तर मला वाटत हा ठराव करतांना थोड all encompassing futurecasting असा जर ठराव केला की त्यात नवीन या ज्या काही गोष्टी आल्यात तरी प्रत्येक वेळी आपल्याला तेवढा वेळ मिळणार नाही की GB call करुन लगेच करायला. पण तशाप्रकारे ठराव जर काही करता आला, आपल्यासारख्या सिनीयर मंडळींनी काही सजेस्ट केले तर बरे होईल.

**अध्यक्ष, ॲड. फडके** : Vertical शब्द जो आलेला आहे तो अशा महानगरांना डोळयासमोर ठेवून आलाय की ज्यांना Horizontical expansion चा स्कोप नाहीये. म्हणून vertical हा शब्द त्यांनी केलाय. परंतु तुमची सूचना योग्य आहे आणि ती अमलांत आणली जाईल.

यावर प्रसाद जोशी म्हणाले की, माशेलकर समितीचा जो अहवाल आत्ता महाराष्ट्र शासनाने accept केलाय त्यामध्ये मला नक्की सांगता येणार नाही त्याचे exact wording पण विद्यापीठाचा दर्जा देतांना त्याला विशिष्ठ क्षेत्रफळाची मर्यादा ते काढून टाकत आहेत. म्हणून मी सूचवले व्हर्टीकल शब्द न घालता. कदाचित भविष्यात असे होण्याची शक्यता आहे पुणे, मुंबई आपले जिथ-जिथं कॅम्पस आहेत त्या सर्व संस्थांच मिळून ते विद्यापीठ होऊ शकेल.

अध्यक्ष, ॲड. फडके : हो. Vertical या शब्दात अडकून पडायचं नाही हे योग्यच आहे. म्हणून मी आपली सूचना मान्य केली.

ॲड. जैन सर : vertical आणि अजून असेल ते addition त्याच्यात टाकायचं.

**ॲड. फडके :** हरकत काही नाही. आपण जे म्हणत आहात की ती जागेची सूचना क्षेत्रफळाच्या संबंधात आहे. तर असे होणार नाही. कारण काही संस्था एका खोली मध्ये गेली ६० वर्षे आहेत आणि त्या एका खोलीच्या संस्थेला विद्यापीठाचा दर्जा येणार नाही हेही मला माहिती आहे.. परंतु आपण समावेश करु या. ही घटना दुरुस्ती जी आहे, ती दिलेल्या सूचनांसह मंजूर झाली असे मी म्हणू का? याला कोणाचा आक्षेप आहे का? असे सर्वांना विचारल्यावर सर्वांनी होकार दिल्याने व कोणाचाही आक्षेप न आल्याने ॲड. फडके यांनी विषय क्र. ०६ प्रसाद जोशी यांच्या सूचनेसह/दुरुस्तीसह एकमताने मंजूर झाल्याचे जाहीर केले.

**ठराव क्र. ०६ विषय क्र. ०६ :** 'भारत सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरुन व जागतिक व देशपातळीवर शैक्षणिक दृष्टया गरजेचा विचार करुन भारतात व परदेशात शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ (Vertical, Digital, Online etc.), Start-up व Incubation Centre, Higher Education Cluster, Collaboration, Cluster, Merger आणि नवीन Department इत्यादी आणि आवश्यकतेनुसार सेक्शन ८ कंपनी, अन्य प्रकारच्या संस्था, शैक्षणिक प्रकल्प व उपक्रम सुरु करणे. त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता वाढ व विस्ताराच्या दृष्टीने वेळोवेळी गरजेनुसार आवश्यक त्या संस्था, प्रकल्प व उपक्रम भारतात व परदेशात सुरु करणे'. या मजकूराचा समावेश शि. प्र. मंडळी घटना नियम क्रमांक ०२ मधील हेतू व उद्दिष्टे यामध्ये करण्यास मंजूरी देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

## English Translation

6. It is unonimousaly resolved that the following text be incorporated in the Aims & Objects of S. P. Mandali's Constitution in rule no. 02 "Considering the needs of the global and Indian Education environment and the NATIONAL EDUCATION POLICY 2020 of Government of India to establish Schools, Colleges, Universities (Vertical, Digital, Online, etc.), Incubation Centres, Startup Centres, allied Educational Programmes and Projects Higher Education Cluster, Collaboration, Cluster, Merger, New Department etc. & Section 8 Company if required in India and abroad. Also to establish new institutions, allied Programmes and Projects in India and abroad as per the need of the hour".

**इनामदार मॅडम :** धन्यवाद सर, आता आपण **विषय क्रमांक ०७** कडे येऊ या – शिक्षण प्रसारक मंडळीच्या काही सभासदांकडून सूचना वजा पत्र आलेली आहेत. त्या पत्रांचा आपल्याला विचार करायचाय. पहिल पत्र आहे रुपदे समीर यांच. त्यांनी त्यांच्या पत्राद्वारे आपल्याला एक सूचना केली होती की स्वच्छते करता suction machine आणि shredder machine घेण्याबाबत त्यांनी पत्र दिलं होत. त्याच्यावरती विचार झालेला आहे. समीर रुपदे इथे आलेले आहेत, त्यांना बोलायचं आहे का?

**समीर रुपदे :–** नमस्कार, मी यावर्षीच सभासद झालोय याचा मला अभिमान वाटतोय, मी शि. प्र. मंडळीचा सभासद झालेलो आहे आणि दुसरं म्हणजे सांगायच अस की मी एस. पी. मधला, माझी बायकोपण. आणि माझी मुलं पण आता एस.पी.एम. शाळेत आली आहेत. तर मला असं वाटल शाळेत जेव्हा आम्ही आलो, एस.पी.एम. शाळेच्या

आम्ही प्रेमात पडलो पण तिथं ब-याच वेळा अस व्हायच की जाता येता झाडें जी एवढी मस्त दिसत आहेत, आपल्या पुणे शहरामध्ये एस.पी. कॉलेजमध्ये जास्त आहेत. त्याचा पाला-पाचोळा होणार हे सहाजिक आहे. तेव्हा ब-याच वेळा बघायचो की झाडे कापतायेत. डेक्कन भागात जर बघितलं तर suction machine आहे बघा या भागात. त्याने फास्ट काम होऊ शकत. जिथे ५-५/६-६ लोक काम करयतायेत तिथ या मशिनन आपण ते टाळू शकतो आणि दुसरी गोष्ट हे सगळ गोळा करुन त्यासाठी shredder machine जर ठेवल compact असत ते, तर तिथल्या तिथं लगेच पाला-पाचोळा गोळा होऊन खत निर्मिती होऊ शकते. म्हणून मी सूचना दिलेली आहे, त्यामुळे अजून स्वच्छता आणि टापटीप राहू शकते. धन्यवाद!

**इनामदार मॅडम :** धन्यवाद सर, यासाठीच खत प्रकल्प आपण उभारलेला आहे आणि इतर महाविद्यालयांमध्ये ही हा प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न चालू आहेत. पुढचं पत्र आहे श्री. पी. पी. कुलकर्णी, सोलापूर यांच. के.पी.एम. बाबतचं चौकशीच पत्र त्यांनी दिले आहे. त्यांनी जी माहिती मागवली होती, ती माहिती आपण त्यांना पत्राद्धारे कळवलेली आहे.

अध्यक्ष, फडके सर यांनी यावर पी. पी. कुलकर्णी उपस्थित आहेत का? आणि त्यांना काही बोलायची इच्छा आहे का? अशी विचारणा केली असता श्री. पी. पी. कुलकर्णी यांनी अजून माहिती मिळाली नाही असे सांगितले.

त्याबाबत इनामदार मॅडम यांनी मी चौकशी करुन सांगते. पण त्यांनी माहिती पाठवली आहे आणि ती तुम्हाला पाठविण्याची व्यवस्था केलेली आहे असे सांगितले. त्यानंतर इनामदार मॅडमनी पुढील पत्राची माहिती दिली. त्यावेळी त्या म्हणाल्या पुढचं पत्र आहे डॉ. रिसबूड सरांचे. त्यांनी आपल्याला मागच्या मिटींगमध्ये विषय झाला होता त्याप्रमाणे आपण सगळयांना ओळखपत्र पाठवलेली आहेत आणि बहुतेकांना ती मिळालेली आहेत. त्याबद्दल संस्थेच त्यांनी अभिनंदन केलेलं आहे. आणि रिसबूड सर नेहमीच आपल्याला प्रोत्साहन पर काही तरी माहिती देत असतात आणि सूचनाही करत असतात त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याच्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, मनुष्यबळ, नियोजन आणि विकास हे जरा प्रभावीपणे संस्थेमध्ये व्हायला हवं. नंतर 'मातृदेवो भवः' अस ब्रीदवाक्य इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये विशेषतः मुलींच्या शाळेमध्ये असायला हवं आणि तिसरी सूचना त्यांनी लेखापरिक्षक नियुक्तीबाबत केलेली आहे. या सर्व सूचनांचा विचार नियामक मंडळाच्या मिटींग मध्ये झालेला आहे आणि त्यानुसार त्यांच्या सूचनांसाठीचं पत्रही त्यांना आपण पाठवलेलं आहे. जर रिसबूड सर इथे उपस्थित असतील तर त्यांना पत्र मिळाल आहे का? रिसबूड सर उपस्थित नसल्याने इनामदार मॅडमनी अध्यक्षांच्या परवानगीने पुढील पत्राची माहिती दिली. डॉ. सतीश वळसंगकर, सोलापूर यांच पत्र आहे त्यांनी के.पी.एम. संदर्भात काही माहिती मागवली होती. तर सर आपल्याला काही बोलाचय?

**डॉ. सतीश वळसंगकर :-** गेले दोन दिवस मी नियामक मंडळाबरोबरच होतो. त्यांनी सर्व माहिती दिलीय आणि मला खात्री आहे की आता मंगळवेढेकर संस्था व्यवस्थित चालेल. यावेळी मी आपल्या अध्यक्षांचे मुद्दाम आभार मानतो कारण मी ब-याचदा तब्येतीच कारण दिलं पण त्यांनी मला सतत उत्साह दिला आणि त्यांच्यामुळेच ते व्यवस्थित झालेलं आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद! संस्था उत्तम चालेल याच्याबद्दल मला खात्री आहे. I am happy with work त्यामुळे मला आता उत्तराची काही गरज नाही.

यानंतर इनामदार मॅडमनी श्री. गुलाबचंद बारड, श्री. शरद नागणे आणि श्री. जे.जे. कुलकर्णी या सोलापूरच्या सभासदांनी पत्र दिल्याची माहिती दिली. मा. अध्यक्ष, फडके सर यांनी यांच्यापैकी कोणी उपस्थित आहेत का

आणि कोणाला बोलायचे आहे का असे विचारले. त्यावर तिघांनाही बोलायचे आहे असे सांगितल्याने मा. अध्यक्ष यांनी एकेकास बोलण्यासाठी माईक देण्यास सांगितले.

**जे. जे. कुलकर्णी, सोलापूर :–** जर आमच्याही पत्राचं उत्तर आलं असत तर आम्हाला इथ बोलायची वेळ आली नसती. पत्र दिलय १३/०३ ला, मुदतीत दिलेलं आहे. तर त्या पत्राचा धागा पकडून मला एवढंच म्हणायचय की, मुंबई–पुण्याच्या संस्था मोठया होतात, आत्ता सतीशने कौतुक केले, मग सोलापूरची संस्था अजून मोठी होऊ नये ही आमची खंत आहे. मूळात के.पी.एम. बंद पडतीय, जगतीय का, पुढे जातीये हे अधांतरी आहे. जनसंपर्क असल्याशिवाय अशा संस्था मोठया होत नसतात. कित्येक गोष्टी अशा आहेत की बोलायला वेळ नाही म्हणून बोलणार नाही. पण पूर्वी सोलापूरची हरीभाई शाळा असतांना एक Advisory Body असायची. ती बरीच वर्ष झाली चालू करा म्हणून आम्ही भेटलो देखील होतो पण त्याबद्दल दखल घेतली जात नाही.

एका सोलापूरात नऊ ठिकाणी संस्था काम करतीये. सोलापूर बरोबर अन्याय झाला तो इथे आमचे दोन मेंबर निवडून येत असतांना इथे एकच आपण या निवडणूकी मधे निवडला. अजूनही आमची विनंती आहे की त्याच्या मदतीला म्हणा, एकटयाच्याने काम होणार नाही हे. let him do his profession also तर नऊ संस्थांचा कारभार तो एकटा कसा करु शकणार? तेव्हा आम्हा सर्वांची विनंती की त्वरित एक सदस्य स्विकारावा, स्वीकृत करावा. ती काळाची गरज आहे. हे एवढं लहान नाही. एखाद्या माणसाला त्याच्या आवाक्याच्या बाहेर वजन उचलायला सांगितलं तर ते वजन तो उचलू शकणार नाही, तर तो पडेल. जनसंपर्क नाही ठेवला जात. शाळेत कधी आम्हाला बोलावलं जातच नाही. एक उदाहरण देतो मघाशी मॅडम म्हणाल्या हे की सोलापूरला चितळे सर येऊन गेले आम्हाला कळलचं नाही. आम्हाला बोलवा, आम्ही येऊ तुमच्या मदतीला. येऊन गेल्यावर कळत की येऊन गेले. चाय पे चर्चा झाली पाहिजे. आमच्याकडे या आम्ही तुमच्याकडे येऊ आणि आम्हाला तुमच्या बरोबर काही अदान–प्रदान करता येईल. तेव्हा अशी वार्षिक सभेची वाट बघायची जरुरी लागणार नाही. कारण मंगळवेढेकर इन्स्टिटयूट बद्दल गेली दोन वर्षे काय जे आम्ही ऐकतोय ते ऐकून खंत वाटते. ज्या मंगळवेढेकरांच्या नावाने इन्स्टिटयूट चालू केली त्यांचा मी विद्यार्थी आहे. आम्हाला भूषण आहे की, सरांच्या नावाने सोलापूरात, सतीश वळसंगकरने खूप पुढाकार घेतल्याने इन्स्टिटयूट चालू तरी झाली. सर सांगायला आम्हाला खेद वाटतो इथे अजित शहा स्टेजवर असतांना, अरुण टिकेकर स्टेजवर असतांना एक समारंभ नू.म.वि. मध्ये झाला त्या सभेत पहिली देणगी आमच्या ६१ सालच्या बॅचने दिलेली आहे १४ हजार रुपये. २०११ सालची गोष्ट आहे, परंतु आजपर्यंत आम्हाला शि. प्र. मंडळीची पावती नाही. ते १४ हजार रुपये कुठे गेले? मग असं झाल की काय होत काय कारभार आहे? मी स्वतः जाऊन चौकशी केली. १४,०००/– तशी रक्कम थोडी आहे, ती उरलेली होती आणि आमच्या सरांच्या नावाने इन्स्टिटयूट चालू होतीय. म्हणून ते दिलेत. ते सोडा. मागच्या वर्षी ज्या डाय–या वाटण्यात आल्या सभासदांना काही पोस्टाने आल्या, काही मेंबरनी वाटल्या. पण आम्हाला ती मिळाली नाही. पी. पी. कुलकर्णींच्या कृपेमुळे ती आम्हाला मिळाली, त्यांनी मला एक डायरी आणून दिली. आम्हाला डायरी नकोय पण असा दूजाभाव का? द्यायची तर सगळयांना द्या ना. आम्हीही मेंबर आहोत, आम्ही सभासद आहोत. अशा या गोष्टी घडू नयेत ही आमची अपेक्षा आहे. ही शि. प्र. मंडळीची मंगळवेढेकर इन्स्टिटयूट मुंबईच्या इन्स्टिटयूट सारखी नावारुपाला आणायला पाहिजे. त्याच्यासाठी आम्ही मदत करायला तयार आहोत. पण गाडीची व्हील चांगल्या माणसाच्या हातात द्या. बैलगाडीचा कासरा चांगल्या माणसाने ओढला तरच बैल ऐकतात. तसं होऊ नये म्हणून आमची तळमळ आहे. ज्या काय टीका यायला लागलेल्या आहेत त्या लवकरात लवकर थांबवा. कोर्टात केस जाते, १०० वर्षांच्या संस्थेमध्ये कोर्टात गेलेली केस पहिलीच, खेद वाटतोय सांगायला आम्हाला. का होतेय अस याचा मागोवा घेतला पाहिजे म्हणून या पत्रात लिहलेल्या सूचना आहेत आमच्या लवकरात लवकर Advisory

Committee नेमावी आणि आमच्या सोलापूरच्या स्थानिक सुधारणांसाठी आम्ही काम करु, आम्हाला तुमच्याशी कुठेही वाद घालायचा नाही. माझं मत पर्सनली असय आता मुंबईत त्या संस्थेचे आकडे वाचले, इथल्या संस्थेचे आकडे वाचले हे सोलापूरला का होऊ नये? म्हणून सक्षम हातात हा घोडा दिला पाहिजे. सोलापूरची संस्था आणखीन मोठी व्हावी. एप्रिल मध्ये ॲडमिशन साठी आता लोकांना वाट बघावी लागतीय. पहिली दोन वर्ष रांग लागली होती, ती काय झाली? म्हणून के.पी.एम. वाचवण्यासाठी आपल्याला जे काही करता येईल ते लवकरात लवकर कराव ही आमची तळमळ आहे. तीन पिढया आमच्या तिथ शिकलेल्या आहेत. माझे वडिल तिथ शिक्षक होते, विद्यार्थी होते म्हणून आम्हाला तळमळ आहे. आम्ही काय नुसती शाळेत ॲडमिशन घेऊन शिकून बाहेर पडलेलो नाही. आम्हाला त्या संस्थेबद्दल, शाळेबद्दल जे वाटतं त्याच्यासाठी आम्ही योगदान द्यायला तयार आहोत. उदा. सांगतो आता चितळे साहेब म्हणाले तुम्ही शताब्दीच आटपून घेतल. मी त्यावर उत्तर दिल याचा event झाला असता तर संभाव्य देणगीदारांना आम्ही तिथं हजर केल असत. संधीचा फायदा घ्यायला पाहिजे ना. आता चितळे साहेब म्हटले राहून गेले. आता event का करायचा तर आपल्या संस्थेला बिल्डिंग बांधायला निधीची जरुरी आहे. आता देणग्या मागायला कोणी जात नाही, देणग्या द्यायला कोणी येत नाही. आमच्या डोळयांनी आम्ही पाहिलयं, मंगळवेढेकर सरांनी चालत फिरुन सभासद मिळवलेले आहेत. आणि जिथे-जिथे मंगळवढेकर सर जात होते देणगीसाठी तिथून ते कधीही विन्मूख परत येत नव्हते. अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. आपल्या-आपल्या व्यवसायात आपण इतके गढले आहोत की शाळेसाठी देणग्या गोळा करायला drive काढायला पाहिजे. मला शताब्दी बद्दल आता काही बोलायचं नाही that has gone. आता आमची ही तळमळीची सूचना आहे पत्र देण्यामागे जो हेतू आहे त्याचा नियामक मंडळाने गांभीर्याने विचार करावा. धन्यवाद!

यानंतर मा. अध्यक्षांनी श्री. शरदजी नागणे यांस बोलण्यास सांगितले.

**शरद नागणे :** आत्ता जे.जे. कुलकर्णी सरांनी जे सांगितलं त्या मताशी मी सहमत आहे. परंतु मी मागच्या मिटींगला २०/८/२०११ ला एक पत्र दिलं होत, त्याचही अजून उत्तर मिळालेले नाही. बरं पी. पी. कुलकर्णींना मिळत नाही तर मला कुठून मिळणार. मला सामान्य सभासदाला. तुम्ही खाचणे यांचा अहवाल वाचला तर किती भ्रष्टाचार झालेला आहे त्याबद्दल मी आत्ताच सर्व दिलेल आहे. त्याबाबतीत काहीही केलेलं नाही गेल्या दोन वर्षापासून. के.पी. मंगळवेढेकर हे आमचे मुख्याध्यापक होते सर. आम्हाला संस्था मोठी करायचीय, एका माणसासाठी संस्था बंद करणार आहे का? ही चुकीची पध्दत आहे. तुम्ही भ्रष्टाचार मुक्त के. पी. मंगळवेढेकर केल पाहिजे. धन्यवाद सर !

यानंतर गुलाबचंद बारड यांना बोलण्यास मा. अध्यक्षांनी सांगितले. श्री. बारड यांनी एवढेच सांगितले की, आम्ही शि. प्र. मंडळीकडे पत्र दिलेलं आहे, तिघांनी मिळून. आता कुलकर्णी सर आणि आमचे मित्र नागणे दोघेही बोलले आहेत. फक्त माझी विनंती एवढीच की पत्रातील सर्व मुद्दयांचा यावर विचार करावा. धन्यवाद!

यानंतर चिटणीस, डॉ. इनामदार यांनी **विषय क्रमांक ०८** मांडला - मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांचा विचार करणे. आणि अध्यक्षांच्या परवानगीने ज्यांना आयत्या वेळचे विषय मांडायचे आहेत त्यांनी बोलावे असे सांगितले. त्यावर खालील सभासदांनी आपले मुद्दे खालीलप्रमाणे मांडले.

**श्री. न. म. जोशी :-** अध्यक्ष महाराज मला एक १० मिनीटं लागतील, १२ होतील पण १५ नक्कीच होणार नाहीत. तीन वर्षापूर्वीच्या सभेमध्ये माननीय अध्यक्ष महोदयांनी मराठीचा मुद्दा काढला आणि माझंच नाव घेऊन त्यासाठी काहीतरी सुरु करावं अस सूचवलं. नंतर मा. जैन सर यांनी मला असं सांगितल तुम्हाला एक ऑफीस त्या ठिकाणी

करुन देतो, फोन देतो तुम्ही काम सुरु करा. सगळी आश्वासन झाली, बरोबरच आहे, काम काही झाले नाही. पण त्याच कारण कोरोना. दुसरं काहीही नाही. पण याबाबत काहीतरी व्हायला पाहिजे आणि नेमक काय व्हायला पाहिजे? सर्वांच्या मनामधे असं आहे की मराठीमधे करायचं म्हणजे नेमक काय करायच आहे? म्हणून त्याच एक vision document मी आपल्याला थोडक्या वेळामध्ये देणार आहे. त्यातलं जे आपल्या हातून होईल ते आपण करु. त्याच्या आधी एक पहिली गोष्ट सांगतो की आपल्या संस्थेमध्ये आपण घटनेमध्ये दुरुस्ती केली ती अतिशय अप्रतिम आहे आणि काळाबरोबर जाण्यासाठी ती अत्यंत आवश्यक आहे.

तर पहिल उद्दिष्ट हे मराठीचं आहे आणि म्हणून आपल्या संस्थेची ओळख इंग्रजी मध्ये आपण ज्याला identity म्हणतो ती ओळख आपण टिकवली पाहिजे हा आपला त्यातला पहिला महत्त्वाचा मुद्दा आहे. Identity म्हणजे नेमकं काय त्याची तीन उदाहरण मी आपल्याला देतो. आमचे मित्र श्रीनिवास पाटील कराड च्या शाळेतून शिकायला बाहेर पडले आणि यशवंतराव चव्हाणांनी त्यांना सांगितलं पुण्यामध्ये तू जा आणि एस. पी. कॉलेजमध्ये ॲडमिशन घे. यशवंतरावांनी असं त्यांना सांगितल याला म्हणतात identity. दुसरं उदाहरण नू.म.वि. मध्ये आम्ही सर्व शिक्षक असतांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्राज्ञ परिक्षेचे क्लासेस आम्ही चालवत होतो. बाकी सर्व विषयात विद्यार्थी तर उत्तमच होते पण महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्राज्ञ परिक्षेला वर्गच्या वर्ग बसत असे. त्यातलं उत्तम उदाहरण मी तुम्हाला सांगतो की, पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख असलेले आपले माजी विद्यार्थी श्रीधर गोखले हे आपल्या शाळेतून साहित्य प्राज्ञ झालेले होते. तर इंग्रजी विभागाचा प्रमुख हा साहित्य प्राज्ञ मराठी होतो ही आपली ओळख आहे. आणि तिसरी एक गंमतीशीर ओळख तुम्हाला सांगतो राहूल सोलापूरकर यांनी ही कहाणी सांगितलेली आहे. त्याच्या एका परदेशातल्या मित्राशी त्याचा ई-मेल वरुन पत्रव्यवहार चालू होता आणि ते चालू असतांना ४/५ पत्र झाली, तर राहूलनं त्याला विचारल तू नू.म.वि. चा विद्यार्थी आहेस का? म्हणजे आधी माहिती नव्हतं. तो म्हणाला तू कसं ओळखलस? कारण तुझ्या प्रत्येक पत्रात प्रत्येक पत्राच्या ओळीत फक्त आठच शब्द आहेत आणि आठंच शब्द ज्याच्या ओळीत तो न.म.जोशी आणि नू.म.वि. चा विद्यार्थी असला पाहिजे. अस त्यान त्यावेळी मला सांगितलं याला identity म्हणतात. तर अशी identity ही आमच्या संस्थेची की मराठी म्हटलं की शिक्षण प्रसारक मंडळी. बाकी सर्व गोष्टी आपण छान-छान करुया, करायलाच पाहिजेत. आता तुम्ही एस.पी.एम. ची सुंदर शाळा उभारलेली आहे, त्या सगळयाबद्दल तुमचं अभिनंदन करतो. पण अशी ओळख कशी निर्माण करता येईल? तुम्ही म्हणाल न. म. जोशी नुसत सांगतायेत, तर तुम्हाला जे ५/१० मुद्दे मी देतो त्यातलं जेवढ जमेल तेवढ आपण करुया आणि मग पुढे जाऊया. त्यातला पहिला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शिक्षण प्रसारक मंडळीच्या प्रत्येक घटकाने, अध्यक्षांपासून ते प्राथमिक शाळेतल्या शिपायापर्यंत आपली स्वाक्षरी देवनागरीत करायची. तिथपासून आपण सुरुवात करुया. तुम्हाला वाटलं तर खाली ती तुम्ही इंग्रजीत करावी म्हणजे अशोक वझे यांना वाटलं तर त्यांनी अशोक वझे अशी स्वाक्षरी केली पण त्याला वाटल पासपोर्टवर ही चालणार नाही तर खाली त्यांनी ती करावी. माझ्या पासपोर्टवर सुध्दा माझी स्वाक्षरी देवनागरीत आहे आणि ती चालते. ही आपली identity.

क्रमांक ०२ महारष्ट्र साहित्य परिषदेच्या मराठी परिक्षेला आपल्या शाळांमधील अधिकाधिक विद्यार्थ्यांना बसवणे की जी आपली नू.म.वि. ची पूर्वीची परंपरा होती. आपल्या allied activities मधून. आता पराग ठाकूर आहेत इथं, बाकीच्या शाळांचे लोक आहेत, तर त्यांनी ही आपली एक identity करुन घ्या.

तिसरं २७ फेब्रुवारी हा जो 'मराठी राजभाषा दिन' हा सर्व संस्थांमध्ये मोठया प्रमाणात साजरा करुया. तो महाराष्ट्रात साजरा होतो, तो आपल्याकडे साजरा झालाचं पाहिजे मोठया प्रमाणा मध्ये. यानंतर १७ मार्च हा विष्णूशास्त्री

चिपळूणकर यांचा स्मृतीदिन असतो. तो नू.म.वि. मध्ये पूर्वी मोठया प्रमाणावर साजरा केला जात असे. पण दुर्दैवाने आता ते बंद पडलेलं आहे आणि विष्णूशास्त्री हे मराठी भाषेचे शिवाजी होते. पण लक्षात घ्या विष्णूशास्त्रीजी मराठी भाषेचे शिवाजी असले तरी इंग्रजीला त्यांनी नाकारलेलं नाही. त्यांनी इंग्रजीला वाघिणीचं दूध म्हटलेलं आहे. पण हे वाघिणीचं दूध पचवायला पहिल्यांदा गाईचं दूध पचवाव लागत, म्हणजे आपल्या मातृभाषेचं दूध पचवायला लागतं हे ही विष्णूशास्त्रींनी सांगितलयं. त्या विष्णूशास्त्रींचा स्मृतीदिन ही संस्था पातळीवर अत्यंत मोठया प्रमाणावर सर्व कौन्सिलर्सनी सुध्दा त्यामध्ये सहभागी होऊन आपापल्या संस्थांमध्ये साजरा करावा. म्हणजे आपली identity निर्माण होईल. मराठी राजभाषा गीत ‘लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी... हे सुंदर गीत आहे. मराठी संबंधीची अनेक गीतं आहेत. त्यांचा गीतमंच आपण तयार करावा आणि त्याच सुंदर सादरीकरण कराव. मराठी साहित्य संमेलनात आमच्या गीतमंचाच गीत सादर केलं पाहिजे, त्यांनी तुम्हाला निमंत्रित केलं पाहिते इतक ते सुंदर गीत झाल पाहिजे. अशा activities आपल्याला करता येतील. एखाद्या चांगल्या कीर्तनकाराकडून मराठी भाषेचे आख्यान बसवून घ्यावे आणि आपल्या सर्व संस्थांमधून ते प्रसारित करावं.

दुसर शिक्षण प्रसारक मंडळीचे ओळख पुस्तक एक छान काढलेलं आहे. मलाच त्यांनी ॲडव्हायजर नेमल होतं. छान काढलेय ते. पण मराठीच्या बाबतीत आपण एक शिक्षण प्रसारक मंडळी मातृभाषा गौरव पुस्तिका अशी मुद्दाम सादर करावी. मित्रहो शिक्षण प्रसारक मंडळीनं आत्ता पर्यंतच्या १२ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष दिलेले आहेत. ०४ बालकुमार अखिल भारतीय साहित्य संमलेनाचे अध्यक्ष दिलेले आहेत आणि ५ अखिल भारतीय नाटयसंमेलनाचे अध्यक्ष दिलेले आहेत. ५/५० मोठ्ठे कवी, लेखक वसंतराव आपटयांसारखे हे शिक्षण प्रसारक मंडळीचे आहेत. पण त्यातल्या काही लोकांची नावं तरी आपल्याला माहिती आहेत का? आपल्याच महाविद्यालयात असलेले श्री. शाम आफळे या फिजिक्सच्या प्राध्यापकाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेलं आहे, हे आपल्या पैकी किती जणांना ठाऊक आहे हे मला माहिती नाही. ही ओळख आपणच जर आपली विसरत असू तर मग बाहेरचे काय करणार? साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाल्या बद्दल शाम आफळेंचा बाहेर सत्कार होतो पण शि. प्र. मंडळीच्या आवारात जर ते माहित नसतील तर भलतीच पंचाईत आहे. म्हणून ‘मातृभाषा गौरव पुस्तिका‘ या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचे विचार अशी एक छान पुस्तिका आपण तयार करावी आणि ज्या-ज्या वेळी मोठे इथे पाहुणे येतील त्यांना या पुस्तकाच्या बरोबर हे पुस्तक द्याव म्हणजे मराठी आमची identity आहे अशा पध्दतीनं त्याला येईल. आणि आता शेवटचं म्हणून तुम्हाला सांगतो की मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी चळवळ सध्या सगळीकडे सुरु आहे. तो अजून मिळालेला नाही. पण शिक्षण प्रसारक मंडळीनं आपल्या उद्दिष्टांनुसार माननीय पंतप्रधानांना या सर्वसाधरण सभेचा ठराव म्हणून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा असे अधिकृत पत्र त्या ठिकाणी पाठवावे म्हणजे आपल्या संस्थेचाही भाग त्याच्यामधे आहे असं सिध्द होईल.

आता त्यातला दुसरा ‘ब‘ भाग की हे सर्व कार्य करण्यासाठी काय-काय करावं, कोण करणार हे न. म. जोशी नुसतं बोलतायेत. माझं वय आता ८७ आहे. त्याच प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि चालत येऊन मला करता येईल किंवा अशोक वझेंनी कधी आणलं मला गाडीमधून तर येईन. पण त्यासाठी एक स्ट्रक्चर मी आपल्याला देतो यातल्या प्रत्येक मुद्दयावरती कार्यकारिणीतला एक सदस्य हा त्याला जबाबदार राहील आणि प्रत्येक संस्थेतला १-१ शिक्षक, प्राध्यापक यांची की एक मराठी भाषा संवर्धन समिती म्हणून तुम्ही नेमावी आणि हे सर्व उपक्रम आपल्याला करता येतील का हे पहावं. अशा एकंदर १० सूचना मी या ठिकाणी करतो. हा कागद मी चिटणीसांच्या कडे देतो आणि यातलं जे जे करता येईल ते करा. मी कधीही असा प्रश्न विचारणार नाही की, मी सूचना केलेल्यातला ७ वा क्रमांक का झाला नाही? कारण सर्वांच्या मर्यादा मला माहितीयेत. पण विनंती मात्र एकच की ज्या उत्साहाने तुम्ही

इमारती बांधाल, इंग्रजी शाळा बांधाल, आणखीन काही कराल त्याच उत्साहाने मात्र याच्याकडे लक्ष द्या एवढी फक्त माझी आपणाला विनंती आहे. धन्यवाद!

**जे. जे. कुलकर्णी, सोलापूर :-** आयत्या वेळच्या विषयात, सर माझा मुद्दा सभासदत्वा बद्दल आहे. नवीन सभासदांबद्दल आम्ही सहज चौकशी केली, मागची इलेक्शन झाल्यापासून केवळ १७-१८ सोलापूरचे नवीन सभासद झालेत असं आम्हाला इथ आल्यावर कळलं. सभासद कुणाला घ्यायचं करुन, हे तोंड बघून ठरवलेलं आहे. माफ करा मी स्पष्ट बोलतो. फॉर्मच दिले जात नाहीत. सोलापूर सारख्या ठिकाणी ०१ संस्था आता काम करत आहेत. सोलापूरचे सदस्य वाढण्याचे चान्सेस आहेत. एककल्ली कारभारानी तोंड बघून फॉर्म दिला जातो. आम्हाला माहित सुध्दा नाही नवीन १८ सदस्य कोण झाले ते. तर हा दूजाभाव बंद करण्यासाठी, फायनल प्रेफरन्स शाळेच्या माजी विद्यार्थ्यांना द्या, गावात जे मान्यवर असतात त्यांना. तुम्ही आपल्या मनाप्रमाणे आपले सभासद करुन घेऊ नका हे आमचे सांगण आहे. आम्हाला कोणावर टीका करायची नाहियेे. एवढी मोठी संस्था आहे. मागच्या वर्षी मी नॉमिनेशनचा अर्ज घ्यायला आलो होतो. त्या भगिनी क्लार्क त्यावेळी तिथे कोणीतरी होत्या. त्यांनी विचारले की, तुम्ही सोलापूरचे का? म्हटलं हो. ही यादी जरा चेक करुन देता का? सर मी तिथं दीड-दोन तास बसून १६८ मयत झालेल्यांचे टिकमार्क करुन आलेलो आहे. मयत झालेल्यांची नावं कमी करण्याची प्रक्रिया अवघड आहे अस माझ मत आहे. त्या कुटुंबाला काय घेण-देण पडलयं, ते कळवत नाहीत. साधे पोस्टकार्ड टाकत नाहीत. तर याच्या करिता काहीतरी मार्ग सूचवला गेला पाहिजे. जवळ जवळ ५०० ते १००० नावं त्यांची तशीच continue होतायेत. म्हणजे जर मतदान प्रक्रिया घेऊन मतदान झालं तर त्यांच्या नावानं सुध्दा कोणीतरी मत टाकू शकतं. ही शक्यता नाकारता येत नाही. आता यंदा कार्ड दिलीयेत. ते बरं झाल, परवाच आलय माझ्याकडे कार्ड. तर सभासदांची प्रक्रियेचे ठराविक नियोजन व्हायला पाहिजे. मयत झालेल्यांच नाव सुध्दा काढायच, मी त्याच्यावर एक सूचवतो. वर्षातून एकदा शि. प्र. मंडळीच्या या जनरल बॉडीने एकदा जाहीर करावे की शि. प्र. मंडळीचे जे सभासद मयत झालेत त्यांच्या वारसदारांना विनंती करण्यात येते किंवा जाहीर आवाहन करण्यात येते की हे--हे आपल्या घरातील सदस्य मयत झालेत त्यांच्याबद्दल आपण अर्ज पाठवावा. मी त्यांना विचारलं की प्रक्रिया काय आहे? मयत दाखला आणा, त्यांचा अर्ज आणा. हे काम कुणी करायच? पी. पी. कुलकर्णींनी करायचं, वळसंगकरांनी करायच की राजेश पटवर्धनांनी करायचं? ते करण्यासारखं आहे. तर मतदार यादी अपटुडेट होईल. मला माहिती होते म्हणून मी सांगितले पण चूक-भूल देणे घेणे. पण १६८ सदस्य. मोठं बाड ते आमच्याकडे येत त्याच्यात त्यांची नावं अजून आहेत. माझच उदाहरण सांगतो माझी बहिण मयत झाली १९८७ साली. तिचं नाव आहे अजून, लीला केशव कुलकर्णी. कोणीतरी नियामक मंडळाच्या सदस्याने याची जबाबदारी घेतली पाहिजे. त्याकरिता नेमणूक केली पाहिजे. आता आम्ही जरी गेलो त्यांच्या घरी, पत्र पाठवले तरी त्याच उत्तर ते देणार नाहीत याची मला खात्री आहे. मी अनेक संस्थांवर काम केलेलं आहे. हा प्रश्न सगळीकडेच आहे. आता न. म. जोशींनी साहित्य परिषदेचा उल्लेख केला, त्या बॉडी वर मी आहे सोलापूरला, जिल्हा प्रतिनिधी म्हणून. तिथं सुध्दा हीच अडचण आहे की मयत झालेले संबंधीत लोकं कळवत नाहीत. याच्याकरिता काहीतरी मार्ग काढायला पाहिजे आणि सोलापूर मधून अनेक सदस्य इच्छुक आहेत, त्यांना टाळलं जात हे मी इथ धाडस करुन सांगतोय. जो फॉर्म मागायाला येतो किंवा आम्ही सांगितल याच्यांसाठी फॉर्म द्या तर दिला जात नाही. तुम्हाला नको आहेत का नवीन मेंबर्स? एवढे नामवंत विद्यार्थी सोलापूरला येऊन सेटल झालेत, किती नामवंत विद्यार्थी बाहेर आहेत, महाराष्ट्रात आहेत, राज्याच्या बाहेर आहेत त्यांना कुठेतरी attract करुन सांगावे की बाबा शाळेसाठी काहीतरी योगदान दे. मी झोळी पसरायला तयार आहे. केवळ हरिभाई च्या नावानेही लोक पैसे देतील. इन्स्टिटयूटचं मी काही आता रिपीट करत नाही, पण त्याच्या करताही सल्लागार समिती, जी काही आपण नेमाल

ती केवळ तेवढी किंवा हरीभाई पुरती नसावी तर सोलापूरला जेवढया आपल्या संस्था कार्यरत आहेत त्यांच्याकरिता ही समिती असावी. धन्यवाद!

**सुनील शिर्के,** चिपळूण :- चिपळूणच्या बाबतील खरं तर मी आलो होतो आज नेहमीप्रमाण ऐकाव माग बसून म्हणूनच आलो होतो. बोलण्याच धाडस चिपळूणकरांच तस कमीच कारण चिपळूण मध्ये जस आता हे सोलापूरकर म्हणाले तस आज परिस्थिती अशीय की डॉ. देवधर असतील, काका देवकर असतील, नाना जोशी असतील ही आमची सगळी मृत सभासदांची नाव फक्त शिल्लक आहेत. मूळात ही सोडून मला वाटत नाही जिवंत सभासद कोणी आहेत. जसा drive इकडे काढायला पाहिजे तसा चिपळूण मधे पण, परिसरा मधील काही मंडळींना आपल्यामध्ये समाविष्ट करुन घेण्याची गरज आहे. दुसरी गोष्ट म्हणजे की छोटया-छोटया गोष्टींसाठी आम्हाला किंवा आम्हाला आवाजच नसल्यामुळे, सभासदच नसल्यामुळे चिपळूणच्या वतीने कोणीतरी इथे यावा. चितळे सर असतात, आता योगायोग एक मात्र आहे की सोलापूरकरांची जशी तक्रार होती तशी आमची अजिबात नाही. कारण ते आले चिपळूण मध्ये तर कळलं नाही आम्हा कोणाला असे कधीच होत नाही. याच्याबद्दल मी खरंच या आमच्या सगळया मंडळींना धन्यवाद देतो. पण एक आवश्यक आहे की साध्या-साध्या गोष्टीचे कधी कधी निर्णय असे असतात की जे तिथे लगेच घ्यावे लागतात. आता सध्या त्या चिपळूणच्या नदीतला गाळ काढण्याच काम चालू होतं. नदीतला गाळ काढतायेत आपली जागा जी आहे ती थोडीशी खालची आहे. त्याच्या मध्ये आपण जर फक्त ट्रान्सपोर्टेशन चार्जेस दिले असते तरी तो गाळ आपण तिथ आपल्याकडे आणून टाकू शकलो असतो. मी एवढयासाठी शाळेत गेलो आमच्या दोन्ही शिक्षकांजवळ बोललो ते म्हणाले तो गाळ इथे टिकणार नाही. त्याला आपल्याला वॉल अशी ती घालावी लागेल. ते घातल्याशिवाय काय गाळ राहणार नाही. पण मूळात ही फार मोठी जागा आहे जी पुराची जागा म्हणून म्हणतात. अर्थात प्रत्यक्षात जेव्हा असा मोठा पूर म्हणजे २००६ नंतर आत्ताच गेल्या वर्षी आपल्या जागेमध्ये पाणी भरलं. पण तरीदेखील ती जागा उंच अनायसे अतिशय कमी खर्चामधे करता आली असती. पण आपण करु शकलो नाही. कारण का तर ती आपल्याकडे active participation ची कमतरता आहे. मला अस वाटत की जरी distillation wall नसती तरी थोडी कमीत कमी १५ फुटांच्या मागे जर भराव असता आणि तो जर slanting अस असत तर डेफिनेटली तो टिकला असता. पण ते होऊ शकल नाही. म्हणून याच्यासाठी अशा प्रकारचे निर्णय होण्यासाठी चार माणसं आणखी तिथे यावीत. माग एकदा यादी दिली होती विशेष करुन आमच्याकडे सल्लागार समितीचा विषय निघाला सल्लागार समिती सुध्दा आपल्याकडे असायला हवी. आपण दोन/तीन वेळा नाव काढली पण पुढ त्याच काय झाल ते आम्हाला कधीच कळलं नाही. तर अशा प्रकारची सल्लागार मंडळी, जस त्यांनी सूचवल तस काही प्रतिष्ठीत चिपळूण परिसरातील माणसं आणि आपले माजी विद्यार्थी घेऊन कारण आता आपले माजी विद्यार्थी सुध्दा चांगल्या लेव्हल पर्यंत पोहचलेत तर अशावेळेस आपण त्यांना सामावून घेऊन आपण आपली ही करु शकतो. दुसरा एक प्रश्न चितळे सर अनायसे इथे आहेत तरी की CBSE आमच्याकडे झालं तिथे सीबीएसई ला ४० च जास्तीत जास्त विद्यार्थी घेता येतात. आपल्याकडे १०-१५ अस आहे आणि आपल्याला तीन तुकडया करण्याची अशीही वेळ येत आहे आणि आज बाकीच्या ठिकाणी विद्यार्थी येत नाहीत अशावेळी आपल्याकडे सीबीएसई झाल्यामुळ मुलांचा ओघ वाढतोय. पण आपण ते घेऊ शकत नाही. तर त्याच्यासाठी तिसरी तुकडी करावी. अशी तिसरी तुकडी केली तर दरवर्षी एक वर्ग लागणार आहे. कदाचित यंदापुरता एखादा वर्ग आपण ॲडजेस्ट ही करु शकू पण तिथं त्या बांधकामाची पण गरज आहे. रंगकामाच्या बाबतील मला वाटत आता एका कंपनीने कबूल केलय की रंगकाम करुन देऊ. तर अशावेळेस आपण सगळयांनी थोडसं चिपळूणकडे पण लक्ष घालावं. मागे सुध्दा मी बोललो होतो चिपळूणच्या बाबतीत आपण थोडसं सवतीच मूल म्हणून दुर्लक्षित होतेय. जरा आपण त्याच्याकडे बघाव एवढीच विनंती करतो. धन्यवाद!

**सुधीर मधुकर इनामदार :–** मी, सुधीर मधुकर इनामदार, नूतन मराठी ११७०. सर्वात प्रथम मी माझे गुरुजी न.म. जोशी यांना वंदन करतो **गुरुर्ब्रह्मा** म्हणून आणि त्यांनी मांडलेल्या विषयावर मला थोडसं आणखीन काही बोलायचं आहे म्हणून मी आपली परवानगी घेतो. आम्हाला संस्कृत शिकवायला स. वि. सहस्त्रबुध्दे सर होते. आपल्यापैकी ब–याच जणांना ते माहिती असतील. ते आमच लेखन वाचून ते म्हणायचे सामान्यपणे मुलं काही शुध्दलेखन लिहतात, काही अशुध्दलेखन लिहतात तर काही बेशुध्द लेखन लिहतात, की ते वाचल्यानंतर वाचणारा मनुष्य बेशुध्द पडतो. हे आठवायच कारण असं मराठी भाषा संवर्धन या प्रकल्पामधे शुध्दलेखन या विषयाचा समावेश करण्यात यावा अशी माझी वैयक्तिक विनंती आहे. यासंदर्भात मी स्वतः मदत करायला तयार आहे. याच एक कारण असं की गेली २७–२८ वर्ष मी साधारणपणे आठ वर्षाच्या मुलापासून ते ७३ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत हस्ताक्षर आणि शुध्दलेखन या विषयाचा मी मार्गदर्शन करतो म्हणण धाडसाचय पण त्यांना ही सगळी कौशल्य समजाऊन सांगतो आणि तीन किंवा चार ठिकाणी शिक्षकांसाठी शुध्दलेखन या प्रकारात मी शालेय शिक्षकांना माहिती दिलेली आहे. आपण हल्ली बघतो शुध्दलेखनाच्या नावाने आरडा–ओरडा आहे. त्याच्यावर चर्चा केली तर भावना पोहचल्या ना? मग झालं अस ऐकायला मिळत. मराठी भाषेला जर अभिजात भाषेचा दर्जा मिळण आवश्यक असेल तर ती अत्यंत शुध्द स्वरुपात म्हणजे प्रमाणबध्द भाषा ही सगळीकडे पोहचली पाहिजे. यादृष्टीने काही करता आलं तर न. म. जोशी सर मी तुम्हाला मदत करायला तयार आहे. धन्यवाद!

**प्रसाद जोशी :–** नमस्कार, मी प्रसाद जोशी आत्ता नुकताच विषय पत्रिकेवरील विषय क्र. ०६ यासंबंधीचा ठराव मंजूर झालेला आहे. अशाप्रकारे कालनिहाय जे आवश्यक बदल आहेत यासंबंधी संस्थेचे हेतू आणि उद्दिष्ट यामध्ये बदल करण्याच प्रस्तावित केल याबद्दल मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आणि संस्थेचे अन्य पदाधिकारी यांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो आणि आता ठराव मंजूर झालाय म्हणून याच extention म्हणून मी आयत्या वेळच्या विषयामधे एक विषय मांडण्याचा प्रयत्न करतो. आपल्या सर्व इंग्लिश मिडीयमच्या शाळा या Well established, reputed आणि Well-known आहेत. या सर्व शाळांमध्ये प्रत्येकी एक वर्ग हा N.I.O.S. चा मार्गदर्शन वर्ग म्हणून सुरु करावा किंवा तसा विचार मॅनेजिंग कौन्सिलने करावा असा विचार मी याठिकाण मांडतो. मी मुद्दाम इथे NIOS ची शाळा असा शब्द वापरत नाही कारण ते कायदेशीर नाही. परंतु आत्ता हीच व्यवस्था पुणे शहरातील पश्चिम उपनगरातल्या एका शाळेमधे अतिशय व्यवस्थित रित्या सुरु आहे. तिथे सीबीएसई आणि आयसीएसई ची शाळा सुरु आहे. परंतु त्या शाळांमधला एक वर्ग त्यांनी N.I.O.S. मार्गदर्शन केंद्र म्हणून चालू केलेला आहे आणि त्याला पालकांचा भरभरुन प्रतिसाद आहे. आपल्या शाळेमध्ये एस.पी.एम. पब्लिक स्कूल, एस.पी.एम. इंग्लिश आणि चिपळूणची शाळा या प्रत्येक ठिकाणी जर एक वर्ग N.I.O.S. मार्गदर्शन केंद्र म्हणून चालू केल तर मला खात्री आहे सुरु केल्यानंतर तीन वर्षाच्या आत त्याचा break even संबंध फायद्यात जाईल याची मला पूर्ण खात्री आहे. N.I.O.S. चा फायदा एकच आहे की कुठल्याही सरकारी नियमांच अत्यंत मर्यादित त्याला ॲप्लीकेशन आहे. बरीचशी flexibility आणि autonomy आपल्याला मिळते. त्यादृष्टीने आपल्याला ज्या पध्दतीने पाहिजे त्याठिकाणी तो अभ्यासक्रम आपण राबवू शकतो. धन्यवाद!

**मधुमिलींद मेहंदळे :–** नमस्कार, मी मधुमिलींद मेहंदळे. आपण जी नोटीस पाठवलीय ती १० मार्चला पाठवलीय आणि त्याच्यात अशी सूचना आहे की १७ मार्च पर्यंत सूचना द्याव्यात. ही आम्हाला नोटीस मिळालीय ११ तारखेला. आम्ही १७ तारखेपर्यंत सूचना तुम्हाला कशा करायच्या? त्यामुळं घटनेमध्ये अस काही आहे का की २१ दिवस अगोदर सूचना कराव्यात. अस काही नसेल तर कृपा करुन दुरस्त करुन घ्या. कारण हा कालावधी फारच कमी आहे. दुसरं अस की मी माझा ॲड्रेस जो दिला होता सभासद होण्यासाठी आणि त्याच्यानंतर मी माझ घर बदलंल

म्हणून अर्ज केला होता. त्याला आता दोन वर्ष झाली. पण तुम्ही जे कार्ड छापून दिलेत मला त्यावर जुनाच पत्ता आहे. मग ही कार्ड दोन वर्षापूर्वी छापून झालेली आहेत का? असा प्रश्न उपस्थित होतो. कारण मला पत्र आलय ते नवीन पत्त्यावर आलय म्हणजे दोन वर्ष ती पडून होती का कार्ड? असा विषय आहे. तिसरा विषय असा आहे की यात काही benefit आहे की सभासदांना? म्हणून तुम्ही आम्हाला वंचित ठेवलय.

**गंगाधर राजाराम घारे :-** मी, गंगाधर राजाराम घारे, सभासद क्रमांक ५०३५. मी स्वतः एस. पी. कॉलेजमध्ये १९६४ ते ६७ पर्यंत शिकायला होतो. आणि माझ्या घरातील मुलं, बाकीचे नातेवाईक आम्ही सगळे या कॉलेजचे, हायस्कूलचे विद्यार्थी आहेत. थोडीशी सूचना अशी करायची इच्छा आहे की वर्षभरातून किंवा दोन वर्षातून ज्यावेळेला सर्वसाधारण सभा होते, त्यावेळेला आम्हाला इथे येता येतं. सगळया सूचना ऐकायला मिळतात. संस्थेची प्रगती ऐकायला मिळते. सभासदांचा परिचय होतो आणि बरं वाटत की आपण भल्या मोठया संस्थेमध्ये चांगल्या लोकांच्या मध्ये येतोय इथे. परंतु तेवढयाने समाधान होत नाही. मी स्वतः अजून ३/४ संस्थांमध्ये पुण्यातल्या संचालक म्हणून काम करतोय. शिक्षण संस्थांच्या संदर्भातल्या ब-याच गोष्टी, काम करायची सवय आहे. माझी अशी इच्छा आहे की या संस्थांमध्ये हायस्कूलच्या कमिटया असतील, कॉलेजच्या सीडीसी कमिटया असतील किंवा संस्थांमध्ये ज्या समित्या नेमल्या जातात त्याच्या मधे काम करायची आम्हाला इच्छा असेल तर काय करायला पाहिजे? हे मला माझ्या पत्त्यावर कळवले तर बर होईल.

**दिलीप टिकले :-** नमस्कार, माझ नाव दिलीप टिकले. प्रथम तुम्हा सर्वांच अभिनंदन. प्रोग्रेसिव्ह संस्था राहण्यासाठी जी वाटचाल करायला पाहिजे त्या दृष्टीने आवश्यक बदल झालेले आहेत. मी तंत्रज्ञान आणि शिक्षण या विषयावर खूप वर्ष काम करत असल्यामुळ माझी काही सूचना आहे की दोन प्रकार आहेत काळानुरुप न्यू एज्युकेशन पॉलीसी हा एक आहेच, परंतु एकदरीतच काळानुरुप प्रशिक्षण यासाठी कोर्सेस बदलण, कोर्सेस नव्याने करण, विशेषतः व्होकेशनल साठी. नवीन तयार होणा-या कौशल्यांसाठी कोर्सेस डिझाईन करण, त्यासाठी मॉर्डन एज्युकेशनचा वापर करण, blended delivery models तयार करण किंवा त्यासाठी I.T. infrastructure करण. तुमच infra worldclass असल तरी I.T. infrastructure ची आपल्याकडे तयारी करण्याची आवश्यकता वाटतीय. तर कुठेतरी ही mentoring programme या संस्थांसाठी राबवावा. कारण आपल्या कमिटया जरी असतील तरी त्या लोकल लेव्हल ला जी काही improvement करता येईल ती करतील. पण एक long term vision तयार करुन त्याच्या दृष्टीने पुढे आपण गेलो तर नुसता दर्जा ही वाढवणार नाही आपण पण विद्यार्थी संख्या ही वाढवू. आणि आपण परदेशी विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाच केंद्र म्हणून निर्माण होतय याचा आपण सकारात्मक विचार केला पाहिजे. Blended Delivery Model याच्यावर कित्येक वर्ष आपण सातत्याने चर्चा करतोय पण ते वास्तवात आता उतरतय. आपल्यासारख्या reputed brand नी जर पुढाकार नाही घेतला तर मला वाटत आपण कुठेतरी ही संधी गमावून बसू. म्हणून मला अस वाटत की आपल्या संस्थांसाठी मेन्टॉरशीप प्रोग्रॅम सारखा प्रोग्रॅम करावा आणि त्याच्या अंतर्गत सर्वांगिण प्रगती करावी ज्यात शैक्षणिक डेव्हलपमेंट, त्यात I.T. असेल, infrastructure असेल, courses design असतील, re-structuring असेल, Industry partnership असेल अशा अनेक गोष्टींचा विचार जर सर्वांगीण केला तर आपली अधिकाधिक उत्तमोत्तम प्रगती होईल अशी माझी सूचना आहे. धन्यवाद!

**जयंत गजानन पाठक :-** अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने काही प्रश्न विचारतो. आपल्या शिक्षण संस्थेच आत्तापर्यंत बाकी सर्वजणांनी सांगितलच आहे. अभिमानास्पद सगळी कामगिरी आहे. त्याबद्दलसुध्दा मला अभिमान वाटतो. मी वेगळया पध्दतीचा एक प्रश्न विचारतो अध्यक्ष साहेबांना की आपल्या संस्थेमध्ये मला काही

माहिती मिळाली की अजून कोर्टामधे काही शिक्षकांच्या केसेस चालू होत्या. तसेच आणखीन काही नारळकर इन्स्टिटयूटच्या बिल्डिंगमधे असलेले कमर्शियल शॉप्स आहेत त्यांच्यावर पण केसेस चालू आहेत. तर त्याच्यात compromise करुन त्याच्यापुढे का जाऊ शकत नाही? जर ते केल विचार करुन तर ते योग्य होईल. कारण कुठलाही दुकानदार जो आहे हा त्याचा पोटा-पाण्याचा व्यवसाय असल्यामुळे ती जागा ताबडतोब सोडणार नाही. खालच्या कोर्टात, वरच्या कोर्टात, त्याच्या वरच्या कोर्टात तो जाऊ शकतो. याचप्रमाणे जशी आपली शिक्षण प्रसारक मंडळी आहे तशीच आपल्या समोर हुजूरपागा HSCP आहे, त्या सोसायटीमधे पण दुकानं आहेत. सेवासदन संस्थेत दुकानं आहेत. डेक्कन एज्युकेशन सोसायटीतही दुकानं आहेत. ज्यावेळी त्यांना पैशांची गरज होती, संस्थांना त्यावेळी त्यांनी पैसे सगळयांकडून घेतलेत. त्यामुळे संस्थेला त्याचा उपयोग पण झाला आणि आता त्याच्यानंतर इतकी वर्ष गेल्यानंतर आता हा का उपद्व्याप चालू केलेला आहे? विनंती आहे की याच्याबद्दल काहीतरी खुलासा करावा आणि काहीतरी मार्गदर्शन करुन आपण अॅडव्होकेट आहात तुम्ही बघा याच्यात कुठे compromise करता येते का?सगळयांकडून तुम्ही नारळकर इन्स्टिटयूटच्या बाकीच्या इतर लोकांशी सुध्दा कम्युनिकेट करुन काही जर योग्य काही करता आलं तर मी पुढाकार नक्की घेईन.

**यानंतर मा. फडके सर** यांनी सांगितल की, गेली दोन वर्ष एक नवीन पध्दत सुरु करण्याचा एक प्रयत्न केला होता, अनेकजण सदस्य असतात. सोलापूरचा सदस्य असतो त्याला मुंबईत काय चाललंय कळत नसत, मुंबईच्या सदस्याला सोलापूरची अवस्था काही कळत नसते. वर्षातून आपण एकदाच भेटतो. परंतु सगळयांना इच्छा असते की माझी संस्था आहे, माझ्या संस्थेचे बेंगलोर मध्ये कॉलेज आहे काय नेमक चाललयं? म्हणून आपण एक सूचना केली होती की संस्थाप्रमुखांना की तुम्ही २ ते ३ मिनीटांच्या कालावधीमध्ये त्याच व्हिडीओ शुटींग करुन वर्षभरामधे तुम्ही काय-काय मिळवलत? प्राप्त केलत? अशा क्लिप्स पाठवा. तो प्रयत्न पूर्णपणे यशस्वी झालाय असं माझं म्हणण नाही. परंतु त्या प्रयत्नाला सुरुवात झालेली आहे आणि त्याचा भाग म्हणून आत्ता ज्या काही संस्थांनी पाठवलय, अनेक संस्थांनी नवीन असल्यामुळे कुणाचे साऊंड क्लिप चालू नाहीये, कुणाच शुटींग चांगल नाहीये. परंतु त्यातल्या shortlist करुन तुमच्या समोर सादर करत आहेत की जेणे करुन निरनिराळया ठिकाणी संस्थांच काम कस चालू आहे ते आपल्याला कळेल. धन्यवाद!

यानंतर इनामदार मॅडम यांनी Video Clips बघण्याची सभासदांना विनंती केली. यावर संस्थेच्या कार्यालयात डायरेक्टर (ऑपरेशन) या पदावर रुजू झालेले श्री. श्रीरंग कुलकर्णी यांनी या व्हिडोओ क्लिप संदर्भात थोडक्यात माहिती दिली.

**श्रीरंग कुलकर्णी :-** डायरेक्टर (ऑपरेशन) म्हणून नव्याने जॉइन झालेलो आहे. मा. अध्यक्षांनी सांगितल्या प्रमाणे आपण अस आवाहन केले तसे सगळया आपल्या units ना की गेल्या दोन वर्षामधे एका वेगळया परिस्थिती मधून सगळ जग आणि शिक्षणक्षेत्र चाललेले आहे आणि त्यामुळे शिक्षण चालू आहे पण विद्यार्थ्यांशी शिक्षकांचा कनेक्ट होत नाहीये आणि त्यामुळे आव्हानात्मक परिस्थिती होती. त्यामुळे या दोन वर्षांमध्ये आपण कसे पुढे गेलोय या विषयामध्ये पाच मुद्दे, त्याचे काही बिंदू, parameters आपण पत्राने सर्व Units ना पाठवले होते. ११ संस्थांची आपल्याकडे सादरीकरण / प्रेझेंटेशनस आलेली आहेत. आपण तीन ते पाच मिनीटांची video clip पाठवायला सांगितली होती. वेगवेगळया प्रकारे सगळ आलेल आहे. ज्याला जस, जस ती हत्तीची गोष्ट आहे, हत्तीच जे हाताला लागत त्याप्रमाणे तो सांगतो. त्यांना जस समजल, कळल त्याप्रमाणे पाठवलेले आहे. एकाने पीपीटी पाठवलेले आहे. काहींनी थोडया अधिक वेळाच्या पाठवलेल्या आहेत. आत्ता इथ आपण फक्त ६/७ सादरीकरण बघणार आहोत. सगळी बघण शक्य नाही. त्यामुळे एक ६/७ सादरीकरण आपण निवडलेली आहेत ती प्रातिनिधीक

स्वरुपात आपल्या सगळयांना दाखवण्याची व्यवस्था इथे केली जाईल. आपण सगळयांनी ती जरुर पहावीत. यामधे आपल्या काही सूचना असतील तर त्याही नंतर भेटून संबंधित अधिका-यांपर्यंत पोहचवाव्यात. ज्यांनी पाठवली त्या सगळयांच अभिनंदन आहे. काहीजणांना थोडासा वेळ कमी पडला असही काही मुख्याध्यापक आणि प्राचार्यांनी सांगितल पण आगामी काळात हे दरवर्षी आपल्याला करायचं आहे म्हणून सर्व संस्थाप्रमुखांनाही माझी विनंती राहील की Annual feature म्हणून आपल्याला करायचय. त्यामुळे आपण थोडस या विषयामध्ये जरा सतर्क राहूयात. धन्यवाद!

यानंतर खालील संस्थांच्या Video Clips चे सादरीकरण करण्यात आले.

१) नू.म.वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे
२) रा. आ. पोदार महाविद्यालय, मुंबई
३) रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, मुंबई
४) एस.पी.एम. पब्लिक इंग्लिश मिडीयम स्कूल, पुणे
५) एस.पी.एम. इंग्लिश मिडीयम प्रायमरी व प्री-प्रायमरी स्कूल, पुणे.

या सादरीकरणानंतर डॉ. राधिका इनामदार यांनी मा. अध्यक्ष, सदानंदजी फडके यांना अध्यक्षीय भाषण करण्यासाठी आंमत्रित केले.

**मा. अध्यक्ष, फडकेसर :-** नियामक मंडळाचे अध्यक्ष जैनजी, उपाध्यक्ष श्रीकृष्णजी चितळे, सर्वसाधारण सभेचे उपाध्यक्ष गजेंद्रजी पवार, चिटणीस इनामदार मॅडम, उपस्थित नियामक मंडळाचे सदस्य आणि सभासद बंधुभगिनींनो,

आजची ही जी सभा आहे, तिच्यासाठी पहिला प्रस्ताव असा होता की गेल्या वर्षीप्रमाणेच ऑनलाईन आपण सुरु करावं. परंतु कोरोनाचे संकट कमी होतेय आणि नित्यजीवन सुरळीतपणे सुरु झालय अस बघून मग आपण हा निर्णय घेतला की प्रत्यक्ष सभा घ्यायची. अनेकांनी त्यांच्या मनातल्या व्यथा, चिंता, प्रश्न, समस्या सांगितल्या. विशेषतः सोलापूर आणि चिपळूण यांच्या समस्या या महत्त्वाच्या आहेत. संस्थेची प्रगती झालेली आहे, निश्चितपणे झालीये. त्या अर्थाने कोरोनाचा उपसर्ग संस्थेच्या आर्थिक स्थितीवर झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे आणि चांगली घटना आहे. परंतु आपली शिक्षण संस्था आहे, नफा आणि तोटयाच अंदाजपत्रक आणि नफा वाढला म्हणून समाधान मानायच अशी आपली व्यापारी पेढी नाही. संस्था म्हटली तरी तीची सर्वांगसुंदर प्रगती झाली पाहिजे हा अट्टाहास असलाच पाहिजे. त्यामुळे ज्यावेळेला आपण बघितलं, मी हा उपक्रम मुद्दाम का सुरु केलाय कारण की ज्यावेळेला सोलापूरच्या व्यक्तिला कळलं की रुईया कॉलेजमध्ये जेव्हा तो हे चित्र बघत असतांना, क्षणभर त्याला वाटत असेल हे कुठल्यातरी फॉरेनच्या कॉलेजचं आहे का? आणि मग मनात विचार येतो की अरे त्यांना एवढ चांगल आहे तर माझ्या गावामध्ये का नाही? हा विचार आहे हा महत्त्वाचा आहे आणि इथं आलेला प्रत्येक जण तो पोटतिडकीने बोलत होता. तो त्याला त्याच्या गावातल्या शिक्षणाबाबतची तळमळ आणि चिंता होती म्हणून बोलत होता. त्याची मुलं त्या शाळेत जात असतील-नसतील पण त्या शाळेविषयी जी आत्मियता आहे, जे प्रेम आहे ते प्रेम आणि तो ओलावा तो बोलत होता. शेवटी ही संस्था कुणाच्या मालकीची आहे? हे जे सर्वसाधारण सदस्य आहेत त्यांच्या मालकीची आहे आणि त्यांना हे कळलं पाहिजे की मुंबईतल्या रुईया मधे काय चाललंय? मुंबईतल्या वेलिंगकर मध्ये काय चाललंय? नवीन पध्दती मुद्दाम आणाव्या लागतायेत त्याच कारण सांगतो आज बेंगलोर मधल्या इन्स्टिटयूटच आलेल नाहीये. या प्रत्येकाला कळलं पाहिजे की ते जबाबदार आहेत या

सर्वसाधारण सभेला आणि तिथे रिपोर्टिंग वर्षभराचं करायच आहे हे त्यांना कळलं पाहिजे. त्याचबरोबर ज्यांनी पाठवलय त्या सगळयांना कौतुकाच पत्र पाठवा. ठिक आहे, चुका होत असतील, लहान मूल जेव्हा चालायला शिकत त्यावेळी सुध्दा पहिल्या पावलाला ते पडत म्हणून कोणी त्याला लंगडा म्हणून हिणवत नाही. चुका झाल्या असतील त्या परत होता काम नयेत. आज न. म. जोशी आले खूप बरं वाटल. डॉ. वळसंगकर दोन वर्षापूर्वी मला म्हणाले की मला काही अस वाटत नाही मी पुढच्या वर्षी येईन. त्यांना मी म्हटलं अस काही होणार नाही, तुम्ही ठणठणीत असणार आहात आणि आपण पुण्यात भेटणार आहोत.

कोरोनाने माणसाचा आत्मविश्वासच गमावत चालला होता. माणूस आपल्याच घरामधे काळजी करत होती की, आपली हवा ही दुषित नाही ना? आणि हवेतून, आपल्याला घरातल्या हवेतूनच कोरोना होणार नाही ना? अशी दुष्ट भीती मनात येत होती. रस्त्यावरुन ॲम्ब्युलन्स चा आवाज गेला तरी त्यात आपलं कोणी प्रियजन नाहीना अस वाटत होत. संपूर्ण जीवनाला जणू कुठतरी स्मशान शांतता म्हणावी अशी भयाण शांतता जाणवत होती. इतिहास असं सांगतो की प्रत्येक शतकामधल्या २०व्या आणि २१व्या अशा वर्षामध्ये असा त्रास होतो. तो १८२० मधे होता, १९२० मधे होता आणि आता २०२० मध्ये. आजा आपण सर्वजण भाग्यवान आहोत या जागतिक वैश्विक महामारी मधून टिकलो आहेत. आपले स्वकीय, आप्तजन आपण गमावले असतील पण परमेश्वराचे आपण आभार मानले पाहिजेत की आपण टिकलो या सगळया संकटातून.

माझ्या मित्रांना, सभासद मित्रांना मला सांगायचय मघाशी मराठी भाषेचा विषय निघाला त्याबद्दल. जर खरोखरं हा युक्रेनचा पंतप्रधान हा मराठी भाषेमध्ये शिकला असता ना तर त्याला वामन पंडितांच ज्याला आपण म्हणतो नल-दमयंती हेही त्याला शाळेतल्या शिक्षकांनी शिकवल असतं. मला अजूनही ते लहानपणीचे दोन श्लोक आठवतात, दोन कडवी आठवतात ' कलकल कल-हंसे फार केला सुटाया, फड-फड निज-पक्षीं दाविले की उडाय नृपतिस मणि-बंधी टोंचिंता होय चंचू, धरि सृदृढ जया तो काय सोडील पंचू ' तो नल जेव्हा त्या हंसाला सरोवरातल्या असा पकडतो तेव्हा तो कवितेत वर्णन करतोय आणि हंसाने त्या सुटायचा खूप प्रयत्न केलाय पण तो राजाचा पंजा आहे, तो कशाला सोडेल आणि पुढचं कडव महत्त्वाचे आहे ' तदितर खग भेणें वेगळाले पळाले, त्याच्या बरोबरचे जे होते ते वेगवेगळे उडून गेले. 'उपवन-जल-केली जे कराया मिळाले, स्व-जन गवसला जो त्याजपाशी नसे तो, कठिण समय येता कोण कामास येतो' त्यांचे जे प्रिय आहेत ते अमेरिकेत आहेत ते दूर आहेत. त्यामुळे स्व-जन गवसला जो त्याजपाशी नसे तो, कठिण समय येता कोण कामासा येतो. ही जी माझ्या मराठी भाषेची संपत्ती आहे, ती संपत्ती विशाल आहे. आणि आज आपण सर्वजण सुदैवी आहोत की आपण मराठी भाषेमधून आपलं शिक्षण घेतलयं. त्यामुळ हा वारसा चालू ठेवला पाहिजे. सर मघाशी म्हणालेत ना मराठी भाषादिन साजरा करायचा म्हणून. आपल्या वेलिंगकर इन्स्टिटयूट मधे आपण पूर्णपणे भाषादिनासाठी त्या अेबीपी माझा ला पूर्ण दिवस सहकार्य केलं होत. म्हणून तो कार्यक्रम झाला होता. तिथ त्यावेळेला सुप्रियाजी सुळे, विनोदजी तावडे आणखीन आपले मंत्री सुभाष देसाई हे सगळे होते. त्यावेळी दोन मिनीटांकरिता जेव्हा त्यांनी मला बोलायला सांगितले, तेव्हा मी त्यांना हेच सांगितलं होत की आम्ही मराठी भाषादिना करिता जे जे पाहिजे ते सगळ करणार आहोत. आणि सुदैवाने आपल्या भाषेला मान्यता मिळालेली आहे. हे लोकसभे मध्ये मंत्र्यांनी मान्य केलेलं आहे. त्यामुळे आता आपल्याला मान्यते करिता काही ठराव करायची जरुरी नाहीये. पण नीट विचार केला की या मान्यतेसाठी, अभिजात भाषा दर्जा मिळविण्यासाठी आपण एवढे कष्ट का घेतोय, याचा जर विचार केला तर ५०० कोटीं रुपयांच अनुदान वर्षाला मिळतं. मी आपल्या सगळयांना विचारतो की या ५०० कोटी अनुदानावर माझ्या मराठी भाषेची प्रगती आपण अवलंबून ठेवणार आहोत का? ५०० कोटी रुपयांचे अनुदान मिळाल म्हणून मराठी भाषेची प्रगती होणार आहे असं कोणाला वाटत असेल तर ते चुकीच आहे. जोवर आपण जो उपाय सांगितला की

तू तुझी स्वतःची स्वाक्षरी देवनागरीत करत नाहीत, मायबोलीत करत नाहीस तोपर्यंत प्रगती होणार नाही. आज आपण जेव्हा गेट मधे येतो तेव्हा तिथल्या माणसाला विचारतो मेन गेट किधर है? आपण कशाकरिता हिंदीमधे बोलतो? मी मराठी आहे, मी पुण्यामधे आहे मग तो हिंदी भाषिक असला तरी मी मराठीत प्रश्न विचारणार. आपणच आपल्या भाषेची संकुचितता वाढवत आहोत. जर आपण आग्रह धरला, म्हणजे मी स्वतः जज्ज लोकांना दिवसात भेटतो- Highly oblige, Good day ऐवजी जातांना आपला आभारी आहे, शुभदिन हे मी माझ्या जीवनामधे करतो. अस प्रत्येकाने केलं तर त्याचा स्वाभाविक परिणाम प्रत्येकावर होणार आहे. गुड मॉर्निंग कशाला? सुप्रभातम्. सोपे सोपे शब्द आहेत. फोन घेतल्यानंतर आपण हॅलो म्हणतो, कशाला? नमस्कार! काही दिवस जातील सवय लावण्यामध्ये पण ती सवय आपण सगळयांनी लावली पाहिजे हे लक्षात घेतल पाहिजे तरच मराठी भाषेला भवितव्य आहे. नाहीतर अवस्था बिकट आहे. त्या कार्यक्रमामध्ये मी मुद्दाम सांगितल होत की माझ्या मित्राला सांगितल होत की गुगल वर लोकेशन पाठव. त्याने पाठवल आणि मला म्हणाला मी लेनच्या माऊथवर उभा आहे. त्याला म्हणायचं होत गल्लीच्या तोंडावर उभा आहे. हे त्या कार्यक्रमात सांगितलय बर का? आणि जेवायला बसल्यावर त्याचा मुलगा म्हणतो ममा, चटणी चवलेस झालीये. बेचव शब्द आठवला नाही त्याला. त्यामुळे less लावल की इंग्रजी भाषेचा शब्द होतो म्हणून तो म्हणाला चवलेस झालीये. आज आपल्याला ही अवस्था जर काढायची असेल तर त्या ५०० कोटीच्या अनुदानामुळे ही अवस्था काढणार नाही आहोत. म्हणून तुम्ही कार्यक्रम सूचवला होतात 'होय मी मराठीतच शिकलो' हा कार्यक्रम अजूनही संस्थेच्या डोक्यात आहे की जे-जे कोणी सेलीब्रेटीज आहेत, जे-जे कोणी ज्यांनी समाजामधे मान्यता मिळवलीय ते इथे येऊन मी माझ्या मायबोलीमधे, मराठी भाषेमधे शिकलेलो आहे हे जेव्हा पालकांना कळेल त्यावेळी ते पालक अस म्हणतील नाही अरे माझ्या मुलाला सुध्दा मराठीत पाठवलं पाहिजे. त्यामुळे हा कार्यक्रम संस्था विसरलेली नाही. तुम्ही आलात, मार्गदर्शन केलंत, खरोखर आम्ही आभारी आहोत. आता या सर्व पार्श्वभूमीवर मला माहितीय की सोलापूरकरांची निश्चितपणे काहीतरी वेगळी अपेक्षा आहे. परंतु You are not suppose to wash your innerwears in public place. मी काहीजणां कडून चौकशी केली त्यातले माझ्या ओळखीच्या एका महाभागाने शेवटी एवढंच सांगितल की साहेब यातल कोणीच सज्जन नाही आणि कोणी दुर्जन नाही अस म्हणावं लागेल. अरे पण वादविवाद चाललेत ना? तेव्हा तो म्हणाला एका दुकानासमोर खूप गर्दी होती, काहीतरी भांडण चालू होती. मी चौकशीला गेलो आणि चौकशी केल्यानंतर एका वाक्यामध्ये मी माझा निर्णय सांगितला तसा तुम्हाला सांगू का? म्हटलं सांगा ना काय? तर तो म्हणाला दुकानदाराशी भांडत होता की ते खोबरं घेतलेले ते खवट आहे. पण माझा निष्कर्ष असा आहे की खवट खोबरं आणि खटयाळ गि-हाईक असा माझा निष्कर्ष आहे. हे मी मुद्दाम का सांगतोय जबाबदारीने मी ही गोष्ट सांगतोय की याठिकाणी जर कोणी दोषी आढळला तर त्याला संस्थेतर्फे माफ केल जाणार नाही हे मी तुम्हाला नक्की सांगतो. कारण भ्रष्टाचारा विरुध्द आम्ही आहोत आणि म्हणून संस्थेतर्फे मी सांगतो की भ्रष्टाचाराला आम्ही अभयदान देणार नाही हे नक्की. पण त्याचबरोबर हेही तितकच खरं असहे की संस्था चालवतांना शेवटी तुम्हाला शिक्षकांना पगार द्यावा लागतो. तुमची संस्था १३० वर्षांची म्हणून आम्ही फुकट काम करु असे शिक्षक आता नाहीत. त्यामुळे नफा-तोटा, आर्थिक गणित हे बसवावे लागते. हे खरयं की सोलापूर मधे जी संस्था आहे तिचं आर्थिक गणितच बिघडलेल आहे. ते का बिघडलय, त्याच्याकरता मुद्दाम मी आता सगळयांनाच विनंती करेन की तुम्ही जरा ज्याला आपण म्हणतो स्पेशल मिशन जसं मघाशी तुम्ही सांगितलत की ठाकूरांनी मिशन घेतलेल आहे त्या शाळेचं. तसच सोलापूर मिशन. ते काही नाही ते सगळ नीट करायचय जो कोणी चुकला असेल त्याला सांगायच बाबारे इतके दिवस तू चुका केल्यास आता तू मोकळा हो. याच्यापुढ चुका चालणार नाहीत. पण हे कराव लागणार आहे. तसंच चिपळूणचे. चिपळूणची सुदैवाने आता ती एकच व्यक्ती आहे. ती म्हणाली मी एकच हयात आहे, म्हणजे ते आले म्हणजे सगळ चिपळूणच आलं. पण ही अवस्था फारशी चांगली

नाहीये. आपल्याला सर्वांगसुंदर ज्याला आपण म्हणतो आपण की जस वेलिंगकर इन्स्टिटयूट चकाचक असेल तस, तितकच, त्या गुणवत्तेच, तितक्याच दर्जाच संकुल हे सोलापूर मधल असल पाहिजे. बिल्डिंग मुळे मी म्हणत नाहीये पण गुणवत्ता तीच पाहिजे. आमच्या संस्थेची खरी प्रॉपर्टी काय तर जे जे माजी विद्यार्थी आपापल्या आयुष्यामध्ये, आपापल्या जीवनामध्ये, आपापल्या क्षेत्रामध्ये चमकलेत, ती खरी आमची संपत्तीये. आमचे कुलकर्णी साहेब बोलत होते की माजी विद्यार्थी तिथ आहेत. मला अस वाटत सुदैवाने आपल्या सगळयांपैकी गजेंद्रजी पवार तुम्हीच इथले माजी विद्यार्थी आहात. त्या अर्थाने मी या संस्थेचा माजी विद्यार्थी नाही. संस्थेच्या बाहेर जो कट्टा आहे, त्या कट्टयावरचा मला संपर्क मिळालाय. एका कट्टयाच्या संपर्कातून जर मी तयार होऊ शकतो तर ज्यांनी वर्गामध्ये शिक्षण घेतलय ते किती मोठे होऊ शकतात. माजी विद्यार्थ्यांच काम हे जर आपण जोमाने केलं तर आपली ही खरी शक्ती, खरी ताकद ही संस्थेच्या उभारणीसाठी उपयोगी पडेल. आपल्याला माहितीय आपली आत्ता सध्या लेटेस्ट महाराष्ट्राच्या डायरेक्टर जनरल पदावर विवेक फणसळकर आहेत ते आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी, त्यानंतर सूरज मांढरे मघाशी तुम्ही उल्लेख केलात महाराष्ट्राचे एज्युकेशनल कमिशनर आहेत. म्हणजे ज्याला आपण म्हणतो शिक्षण मंत्र्यांच्या नंतर लगेच किंवा कदाचित शिक्षण मंत्र्याच्या काकणभर जास्तच अधिकार हे त्या एज्युकेशन कमिशनरला आहेत. आणि तो आपल्या कॉलेजचा माजी विद्यार्थी आहे. आणि आता हे नाव घेतल की काहींच्या कपाळावर आठी येते, काहींच्या अंगावर काटा येतो, काहींना जरा बरं वाटत अशा ईडीचे Joint Director जे आहेत ते विवेक वाडेकर तेही आपल्या कॉलेजचे विद्यार्थी आहेत. ही जी मंडळी आहेत ती खरी आमची संपत्ती आहे आणि म्हणून या माजी विद्यार्थ्यांच संघटन हे आगामी काळामधे आपल्याला प्रबळ करायचय की जेणेकरुन भविष्यकाळाची झेप ही निश्चितपणे उत्तुंग असणार आहे. एक आपला अजून एक प्रोजेक्ट राहिलय की याच्या पुढच्या कालावधीमध्ये हे नक्की आहे की जैविक रोगराई आणि तीसुध्दा हवेतन त्यामुळे ते मास्क हे ते राहणार आहे. आज आपल्याच मर्यादा आपल्याला कळाल्या आहेत. आपली वेबसाईट अजूनही अपडेट नाहीये, ती नवीन सुरु झालेली नाहीये. पण हे सगळे कार्यक्रम हे वेबसाईटवर आले पाहिजेत. आपल्या जनरल बॉडीच्या सगळया सदस्यांना इथ यायच्या अगोदर आदल्या दिवशी रात्री आपल्या संस्था कुठ-कुठ काय काम करतात हे घर बसल्या कळलं पाहिजे इतकी वेबसाईट आपली अद्ययावत झाली पाहिजे हे आपले संकल्प आहेत. गेल्यावर्षी जे-जे आपण संकल्प केले होते, त्यातल्या सिध्दी काय काय झाल्यात त्याही तुम्ही सांगितल्यात, त्याच्याबद्दल सर्वसाधारण सभेतर्फे मी तुमचे आभार व्यक्त करतो. आता या सगळया पार्श्वभूमीवर पुढची जी प्रगती आणि टप्पा आहे या पुढच्या कालावधीमध्ये परत एखादी अशी साथ येऊ शकते पण परत आता असे बळी पडणार नाहीत. म्हणून आपण कुठलीही संकट आली तरी त्याच्याकरता मुकाबला करण्याकरता तयार राहिलं पाहिजे. एवढयासाठी एक आपल्याला प्रोजेक्ट हातात घ्यायचाय की जे सधन आहेत, जे आपला मोबाईल तीन वर्षांनी बदलतात, त्या कंपनीला बायबॅक मध्ये दीड-दोन हजाराला देतात, त्यांना आपण विनंती करणार की तुम्ही संस्थेकडे तो द्या. आपल्या इथे जे गरीब विद्यार्थी आहेत, ज्यांच्याकडे फोन नाहीत त्यांचे शिक्षण थांबत, त्यांच्यासाठी तो वापर आपल्याला करायचा आहे. ही एक मोहिम आपल्याला सुरु करायचीय आणि ही सुरु केली की इतर शिक्षण संस्था ती घेणार पण We should be trend setter हे लक्षात घ्या आणि आपण ते काम करणार आहोत. या सर्व पार्श्वभूमीवर या पुढच्या कालावधी मधे तुमच्या सर्वांचे सहकार्य संस्थेच्या वाढीसाठी अवश्य लागणार आहे. संस्था ही आपलीच आहे. त्यामध्ये डावा हात आपलाच आहे, उजवा हात आपलाच आहे. परंतु उजवा-डावा हात हे जसे भांडण करत नाहीत, मारामारी करत नाहीत पण डावा हात दुखावला तर उजवा हात त्याला मसाज करतो आणि उजवा हात दुखला तर डाव्या हाताने मसाज होतो. अपेक्षा अशी आहे की सर्वसाधारण सभेमध्ये या दृष्टीकोनातून आपण केलेल्या सूचना कराव्यात, तर निश्चितपणे प्रगती ही होणार आहे. कृपया चेहरा बघून सभासद फॉर्म दिला जातो असे म्हणू नका कारण मी का सांगतो की अस नाहीये, हं आता तुम्हाला

कोण भेटल, काय असेल होऊ शकते. परंतु अस काहीही नाही. संस्था वाढावी असच वाटतय आणि म्हणून आपण यापुढच्या कालावधी मधे या बारीक गोष्टी, खूप बारीक-बारीक गोष्टी आहेत त्या निदर्शनास आणल्या पाहिजेत. आता हे दाखवल म्हणून लोकांना कळलं. मी कोप-यात जाऊन बसलो कारण माझ्या लक्षात आल हा फक्त या निम्म्या भागातल्या लोकांना दिसणार आहे आणि ती sound ची जी यंत्रणा आहे ती सुध्दा नीट नव्हती. यांच्या लक्षात आलय पण आज सुरु झालय. आणि कुठतरी सुरु झाल म्हणजे पुढच्या वर्षी त्यात सुधारणा होत असते. आज आपण अनेक वर्षांनी हा लेडी रमाबाई हॉल बघितला, आपल्या लक्षात आल असेल काहीतरी सुधारणा होतेय नक्की. आपल्याला वेळ नाही, नाहीतर मी विनंती करीन की सहज जाता-जाता स्विमिंग पूल बघून जा. त्या स्विमिंग पूलच्या चार लेन वाढवता येतात रस्त्यावरच्या. तो आपल्याला ऑलिंपिकच्या धर्तीचा करायचाय. क्रीडामंत्र्यांशी बोललो होतो, चालू आहे, करायचाय आपण. International क्षेत्रामध्ये आपली मुलं चमकली पाहिजेत. एवढयाकरता जे-जे कराव लागेल ते करायचय. आपल्या अनेकांना माहिती नसेल की जे विद्यार्थी स्पोर्टस् मध्ये आहेत, त्यांच्याकरिता आपण वेगळया ॲडमिशन आपण देतो. त्याला आपण Protocol दिलेत की नॅशलन लेव्हल चा असेल तर त्याला, स्टेट लेव्हल चा त्याला. मॅनेजमेंटचा कोटा आहे, त्यातनं आपण त्या ॲडमिशन देतोय. त्यामुळ आपल्या स्पोर्टस्च्या ॲडमिशन वाढतील. पुढच्या कालावधीमधे दिसतील की एस. पी. कॉलेजचा हा विद्यार्थी या क्षेत्रात चमकला आहे आणि म्हणून आपल्या सगळयांच सहकार्य अपेक्षित आहे. आज आपण प्रेमाने आलात, ज्या काही गोष्टी सांगितल्यात त्याबद्दल संस्था आपली आभारी आहे आणि आपल्या सगळयांच्या तर्फे मी नियामक मंडळाचा आभारी आहे. धन्यवाद, जयहिंद!

यानंतर डॉ. इनामदार मॅडम यांनी माननीय अध्यक्षांचे आभार मानले आणि त्यांनी जे विचार व्यक्त केलेत त्याच्याशी हे नियामक मंडळ सहमत असल्याचे सांगितले. जस लेडी रमाबाई हॉलच बदललेले रुप आज सर्वांनी पाहिल तशा अनेक गोष्टी की ज्या सभासदांना पाहायला आवडतील त्या करण्याचा नक्की प्रयत्न राहील असेही त्या म्हणाल्या. यानंतर सभेचा प्रोटोकॉल म्हणून, पण अर्थात या सभेमध्ये उपस्थित राहून ज्या तळमळीने सहभाग घेतला त्याबद्दल आभार मानणं हे औधत्य ठरेल तरीही कार्यक्रमाचा एक प्रोटोकॉल असतो म्हणून आभार नव्हे पण आपल्याप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी असे म्हणून त्यांनी मा. नियामक मंडळाचे उपाध्यक्ष, श्री. चितळे सर यांना आंमत्रित केले.

**श्री. श्रीकृष्ण चितळे, उपाध्यक्ष** यांनी सर्वांना अभिवादन केले व आभार प्रदर्शन करतांना ते म्हणाले कोरोना संकटात आपण ऑनलाईन भेटलो होतो. आज आपण आपल्या नवीन सुसज्ज अशा रमाबाई हॉलमधे भेटत आहोत. या रमाबाई हॉलच्या नूतीनीकरणाचे सर्व श्रेय मी सतीश पवारांना देऊ शकतो कारण सतत त्यावरती त्यांनी लक्ष दिलं. त्यामुळे असा सुसज्ज हॉल तयार झाला. गजेंद्रजी आपल्या मनात असलेले एक ९/१० वर्षांपूर्वीच आपल स्वप्न थोडया-फार प्रमाणात साकार झाले आहे अस आपल्याला नक्कीच वाटत असेल.

यावर **संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. गजेंद्र पवार** हे स्वतः उठून म्हणाले की, मी एक स्वप्न बघितले माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून. कारण सप्रेम स. प. म्हणून आम्ही एक संघटना केली होती आणि त्याच्या माध्यमातून अनेक कार्ये या स. प. महाविद्यालयातून केलेले आहेत. त्याचा कार्याध्यक्ष म्हणून मी केल आणि आता ते शेठ सरांच्याकडे फॉरवर्ड केल आहे. आम्ही एक स्वप्न बघितल होत, लेडी रमाबाई हॉल, स्विमिंग पूल. सुंदर व्हावा. आपले जे हे नियामक मंडळ आहे त्यांनी या सहा वर्षामध्ये इतका आमुलाग्र बदल केलेला आहे. मी फक्त स. प. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून सांगत नाही, सर्व संघटनेच्या वतीने मी नियामक मंडळाचे आभार मानतो. धन्यवाद!

यानंतर मा. चितळे सर यांनी आपले आभार प्रदर्शनाचे भाषण पुढे सुरु केले -शिक्षण प्रसारक मंडळीने नेहमीच नवे नवे उपक्रम, नवे नवे बदल स्विकारले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणात होणारे बदल, आपल्या घटनेमध्ये त्याचे बदल दिसले पाहिजेत यादृष्टीने प्रोॲक्टीव्हली आपण त्या घटनेची दुरुस्ती करत आहोत आणि त्यास आपण सर्वांनी मान्यता दिली त्याबद्दल आपणा सर्वांचे आभार. शिक्षण प्रसारक मंडळीचे वार्षिक साधारण सभेस अध्यक्ष सदानंदजी फडके व उपाध्यक्ष हे उपस्थित राहिले त्याबद्दल त्यांचेही आभार. जैन सरांनी त्यांचे भाषणातून शिक्षण प्रसारक मंडळीमधे होणारे बदल, शैक्षणिक उपक्रम, प्रगती याची माहिती दिलेलीच आहे, त्याबद्दल त्यांचेही आभार. या सभेची तयारी करणारे सेवक वर्ग, शिक्षण प्रसारक मंडळीचे कार्यालयातील सेवक, महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे मी आभार मानतो. त्याचप्रमाणे sound recording, sound system यांचेही आभार मानतो. या नवीन नियामक मंडळामध्ये दोन नवीन चेहरे आपल्याला बघायला मिळाले. मी परागजी ठाकूर यांना विनंती करतो की त्यांनी सर्व सभासदांना अभिवादन करावं. तसेच मी काळकर सरांनाही विनंती करतो त्यांनीही सभासदांना अभिवादन कराव. हा परिचय एवढयाकरिताच की हे नियामक मंडळाचे नवीन सभासद आहेत. ठाकूर सर अनेक शैक्षणिक, सामाजिक कामात कार्यरत असतात, ते बँकर आहेत. तसेच काळकर सर हे उद्योगपती आहेत, त्याचप्रमाणे ते एम.बी.ए. आहेत. अनेक गोष्टींचा सल्ला त्यांचा मोलाचा असतो. म्हणून नियामक मंडळ त्यांचे खूप आभारी आहे. खरं म्हणजे आभार मानायचे तर नावे घ्यावी लागतात, पण इतकी नावे घेणे शक्य नाही. म्हणून मी सर्वांचे आभार मानतो. आपण सर्व सभासद या सभेला हजर राहिलात व आम्हाला योग्य त्या सूचना केल्यात व आम्हाला सुधारण्याची संधी उपलब्ध करुन दिलीत याबद्दल मी आपले ही आभार मानतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!

यानंतर इनामदार मॅडम यांनी मा. अध्यक्ष सदानंदजी फडके यांना सभा संपल्याची घोषणा करण्याची विनंती केली व मा. अध्यक्षांच्या परवानगीने त्यांच्यावतीने त्यांनी औपचारिक रित्या ही सभा संपली आहे असे जाहिर केले. परंतु त्याची सांगता पसायदानाने होईल असे सांगून त्या म्हणाल्या त्यानंतर कोणी बोलायचे नसते असा प्रघात आहे, म्हणून आधीच सांगते, सभेनंतर सभासदांसाठी चहा-नाष्टयाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी सर्वांनी चहा-नाष्टा घेऊन जावे ही विनंती. या सभेसाठी शिक्षण प्रसारक मंडळीचा सगळा स्टाफ अहोरात्र धडपडत होता. काही कमी राहिली असेल, त्रुटी राहिली असेल तर सर्वांच्या वतीने मी दिलगि अरी व्यक्त करते आणि आपल्या सगळयांच्या सहकार्याबद्दल मंडळीच्या ऑफीसच्या वतीने आभार मानते. धन्यवाद!

सौ. प्राजक्ता कुलकर्णी, शिक्षिका-एस.पी. एम. पब्लिक स्कूल यांच्या पसायदानानंतर सभा समाप्त झाली.

| | |
|---|---|
| (ॲड. सदानंद गो. फडके)<br>अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी | (डॉ. राधिका इनामदार)<br>चिटणीस, शिक्षण प्रसारक मंडळी |